follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd. No. 72105/99 ⁘ वर्ष २५ ⁘ अंक २०७ ⁘ सातारा ⁘ शुक्रवार, दि. ५ एप्रिल २०२४ ⁘ पाने ६ (सुप्रभात) ⁘ किंमत ५/– रूपये

### रवींद्र धंगेकरांना शिक्षणावरून ट्रोल करणाऱ्यांना सुप्रिया सुळेंचे सडेतोड उत्तर

**पुणे :** बारामती लोकसभा मतदार संघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे पुणे दौऱ्यावर आहेत. त्यानी आज राष्ट्रवादीच्या वीज दरवाढी विरोधात असलेल्या आंदोलनाला हजेरी लावली. यावेळी सुप्रिया सुळेंनी रवींद्र धंगेकर यांच्यावर झालेल्या ट्रोलिंग संदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. त्यासोबतच त्यांनी राज्याची परिस्थिती आणि दुष्काळावरदेखील (पान २ वर)

# धैर्यशील मोहिते-पाटील पवारांना भेटले; सव्वातास चर्चा

**राजदंड / पुणे**

**माढा लोकसभेसाठी भाजपकडून उमेदवार जाहीर करण्यात आला असला, तरी महाविकास आघाडीकडून उमेदवार कोण असणार याची चर्चा अजूनही सुरूच आहे. माढा लोकसभेला महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या वाट्याला ही जागा आली आहे. मात्र, शरद पवार गटाकडून अजूनही उमेदवार निश्चित करण्यात आलेला नाही. पहिल्यांदा या मतदारसंघातून महादेव जानकर यांच्यासाठी शरद पवार यांनी प्रयत्न केल्यानंतर त्यांची उमेदवारी जाहीर सुद्धा केली होती. मात्र, जानकर यांना महायुतीने आपल्या गळाला लावून त्यांना परभणीच्या रिंगणातून उतरवलं आहे. त्यामुळे आता माढामधून कोण उमेदवार असणार याची चर्चा सुरूच आहे.**

भाजपमधील नाराज गट असलेल्या मोहिते पाटील गटाकडून पण माढा लोकसभा मतदारसंघात कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर धैर्यशील मोहिते पाटील यांनी गुप्तपणे शरद पवार यांची भेट घेतल्याची चर्चा आहे. उभय नेत्यांमध्ये सव्वा तास चर्चा झाली झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान या सर्व घडामोडींवर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अभयसिंह जगताप यांनी सुद्धा प्रतिक्रिया दिली आहे.



जगताप यांनी सांगितले की, माढा लोकसभेला अजूनही उमेदवार अंतिम करण्यात आलेला नाही. शरद पवार यांची धैर्यशील मोहिते पाटील यांनी यांनी भेट घेतली आहे. मात्र, त्यांची उमेदवारी अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. आमच्या सोबत चर्चा केल्यानंतर आता हा विषय संसदीय बोर्डामध्ये मांडण्यात येईल. त्यानंतर कोण उमेदवार असेल हे निश्चित करण्यात येईल. पक्ष जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य असेल अशी भूमिका जगताप यांनी मांडली.

दरम्यान, स्वत:च्या उमेदवारीवर बोलताना जगताप यांनी सांगितले की, मला खासदारकीसाठी संधी का मिळावी याची कारणे मी शरद पवारांसमोर मांडली आहेत. माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये एकही इंजिनिअरिंग कॉलेज नाही. प्रामुख्याने या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकता येण्यासाठी इंजिनिअरिंग कॉलेजची निर्मिती हे माझं लक्ष असणार असल्याचे जगताप यांनी सांगितले.

### माढ्यासाठी प्रवीण गायकवाड सुद्धा इच्छुक

**दरम्यान, माढा लोकसभेसाठी प्रवीण गायकवाड यांनी सुद्धा निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. ते म्हणाले की जानकार यांच्या यूटर्न मुळे उमेदवार द्यायचा की नाही याबाबत चर्चा सुरू होती. मी माढ्यातून लढण्यासाठी अनेकांनी आग्रह केला आहे. माढामधून इच्छूक असल्याने शरद पवारांची दिल्लीत, मुंबईत भेट घेतल्याचे प्रवीण गायकवाड यांनी सांगितले.**

# पुढील १५ दिवस राज्यात उष्णतेची लाट


### दुपारी १२ ते ३ घराबाहेर पडू नका; पुणे वेधशाळेचे आवाहन

**राजदंड / पुणे**

पुण्यासह राज्यात अनेक शहरातील तापमानात चांगलीच वाढ झाली आहे. किमान तापमानात देखील वाढ झाली आणि महत्वाचं म्हणजे रात्रीच्या तापमानातदेखील चांगलीच वाढ झाली आहे. त्यात पुढील १५ दिवस उष्णतेची लाट पुण्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कायम राहणार आहे. पुढील काही दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडामध्ये असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये तापमानात मोठी वाढ होईल, असा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तवला आहे.

गेल्या दोन दिवसात विदर्भामध्ये ४२ अंश सेल्सिअस, ४३ अंश सेल्सिअस पर्यत गेले मराठवाड्यामध्ये पण काही ठिकाणी ४0अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. पुणे, नाशिक, जळगाव या ठिकाणी पण आपल्या चाळीसच्यावर आकडे जाताना दिसतात तर सर्वसाधारणपणे गेल्या काही एक दिवसापासून हिट वेव्हची सुरुवात झालेली आहे येणाऱ्या दिवसांमध्ये सर्वसाधारणत: आपल्याला अशाच प्रकारे तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याचे होसाळीकर म्हणाले.

येणारा काळ हा निवडणुकीचा असल्यामुळे अनेक जणे ज्यामध्ये मतदार,



पक्षाचे अनेक लोकं कार्यक्रमात असतील त्यांनी देखील काळजी घेण्याची आवश्यकता आहे. सकाळी १२ ते दुपार ३ पर्यत अतिमहत्त्वाचे नसेल असेल तर बाहेर पडू नका, असा सल्ला पुणे वेध शाळेचे प्रमुख के एस होसाळीकर यांनी दिला आहे.

'वातावरणातील खालच्या थरातील वाऱ्यांमुळे पुढील दोन दिवस राज्यात सर्वत्र हवामान कोरडे राहील. पुढील पाच दिवस कमाल तापमानात विशेष बदल होणार नाही पाच ते नऊ एप्रिल मध्य महाराष्ट्रात ८ एप्रिल मराठवाड्यात ६ ते ९ एप्रिल विदर्भात, ९ एप्रिल कोकण गोव्यात हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे ७ एप्रिलला मध्य महाराष्ट्रात आणि ७ एप्रिलला विदर्भात ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

### सासवड मतदान यंत्रे चोरी प्रकरण

# 'मॅट'चा राज्य सरकारला दणका

**राजदंड / पुणे**

पुरंदर तालुक्यातील सासवड येथील तहसीलदार कार्यालयातून मतदान यंत्र (कंट्रोल युनिट) चोरीला गेल्या प्रकरणी राज्य सरकारने पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम रजपूत अणि उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) तानाजी बरडे यांना निलंबित केले होते. या तिन्ही अधिकाऱ्यांनी याविरोधात महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणात (मॅट) धाव घेतली होती. मॅटने राज्य सरकारला दणका देत या तिन्ही अधिकाऱ्यांचे निलंबन रद्द करत पुन्हा त्याच जागेवर नियुक्तीचे आदेश दिले आहेत.

पुरंदर तालुक्यातील सासवड येथील तहसीलदार कार्यालयातून मतदान यंत्र (कंट्रोल युनिट) चोरीला गेल्याची घटना ५ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली होती. त्यानंतर भारत निवडणूक आयोगाने संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार राज्य शासनाने या तिन्ही अधिकाऱ्यांना निलंबित केले होते. निवडणुकीच्या महत्त्वाच्या कामात कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका या अधिकाऱ्यांवर ठेवण्यात आला होता. या आदेशाविरोधात या अधिकाऱ्यांनी मॅटमध्ये धाव घेतली होती. एक सुरक्षारक्षक आणि एक गृहरक्षक दलाचा कर्मचारी या ठिकाणी तैनात होते.

सीसीटीव्ही चित्रीकरणात चोरी झाली, तेव्हा त्या ठिकाणी सुरक्षारक्षक तैनात नसल्याचे दिसून आले आहे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार वेळोवेळी मतदान यंत्रे ठेवलेल्या गोदामाला भेट देऊन आढावा घेतला होता. चोरी करणाऱ्या आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून मतदान यंत्रासह सर्व मुद्देमाल हस्तगत केला आहे. या तिन्ही अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा दिसून येत नसल्याचा युक्तीवाद करण्यात आला. तो ग्राह्य धरून मॅटने हा निर्णय दिला आहे. त्यानुसार हे तिन्ही अधिकारी पुन्हा आपल्या मूळ पदाचा पदभार घेऊ शकणार आहेत.

# 'आधी उमेदवार बदलण्याची वेळ, आता बालेकिल्ल्यातही जागा राखताना शिंदेंच्या शिवसेनेची दमछाक'

**राजदंड / मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर भाजपकडून दबावतंत्राचा वापर सुरुच आहे. हिंगोली लोकसभा मतदारसंघातून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने हेमंत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, हेमंत पाटील यांच्या उमेदवारीबाबत भारतीय जनता पक्ष नाराजी व्यक्त केली. त्यानंतर शिंदे यांनी उमेदवारी बदलत बाबूराव कदम यांना उमेदवारी घोषित केली आहे. दरम्यान, उमेदवार बदलल्यानंतर आता नाशिक, ठाणे आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग या मतदारसंघ राखण्यासाठी शिंदेंच्या शिवसेनेची दमछाक होताना दिसत आहे. त्यामुळे भाजप चहुबाजूंनी एकनाथ शिंदे यांची कोंडी करत असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत.



हिंगोलीचा उमेदवार बदलल्यानंतर भाजपकडून रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि ठाण्याच्या जागेवर दावा करण्यात येतोय. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने नाशिकच्या जागेवर निवडणूक लढण्याचे संकेत दिले आहेत. मंत्री छगन भुजबळ स्वत: नाशिकच्या जागेवरुन निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. शिवाय, एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेला ठाण्याचा मतदारसंघातून भाजपने निवडणूक लढण्याची तयारी सुरु केली आहे. त्यामुळे शिंदेच्या शिवसेनेत विद्यमान खासदार आहेत, त्यांना पुन्हा एकदा उमेदवारी देणे देखील कठीण झाले आहे.

नाशिकच्या जागेमुळे सातारा लोकसभा अडकली आहे. नाशिक राष्ट्रवादीला गेली तर सातारा भाजपला सुटेल. उदयनराजे भोसले भाजपच्या तिकीटावर लढण्यासाठी ठाम आहे. त्यांची उमेदवारी जाहीर होत नाहीये, पण प्रचार सुरू करण्यात आला आहे. नाशिकमध्ये छगन भुजबळ यांनी देखील प्रचाराची तयारी पूर्ण केली आहे. रत्नागिरी सिंधुदुर्गमध्येही नारायण राणे पुर्ण ताकदीने कामाला लागेलत, त्यामुळे ही जागा भाजपला सुटल्यात जमा आहे असं दिसतंय. तर ठाणे लोकसभेचा आपला आग्रह भाजपने अजूनही सोडलेला नाही त्यामुळे ठाण्याचा तिढा कायम आहे. त्यामुळे ३ ठिकाणच्या उमेदवार बदलानंतर सेनेच्या या ३ जागा स्वत:कडे ठेवण्यासाठी एकनाथ शिंदेंचा कस लागणार असण्याची शक्यता आहे.

नाशिकचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे आणि यवतमाळ-वाशिमच्या खासदार भावना गवळी यांना पुन्हा एकदा उमेदवारी मिळणार नसल्याची चिन्हं आहेत. त्यामुळे भावना गवळी नाराज आहेत. भावना गवळी यांना उमेदवारी दिल्यास यवतमाळमध्ये मोठा फटका बसू शकतो, असं भाजपला सर्वेक्षणातून जाणवलंय. त्यामुळे भावना गवळी यांच्या उमेदवारी मिळू नये, याबाबत भारतीय जनता पक्ष ठाम आहे.

# सातारा जिल्ह्याला दोघा कार्यकारी अभियंत्यांनी बनवले 'संस्थान'

### पीडब्ल्यूडीच्या अप्पर मुख्य सचिवांकडे तक्रार

**राजदंड / मुंबई**

जिवलग मित्र आणि एकेकाळचे सहकारी असलेल्या सार्वजनिक बांधकाम खात्यातील दोघा कार्यकारी अभियंत्यांनी संगनमताने साताऱ्यातील दोन्ही विभाग काबीज करून अख्ख्या जिल्ह्याला आपले 'संस्थान' बनवले आहे. त्यांच्या या युक्तिमुळे अनिर्बंध भ्रष्टाचारासाठी त्या दोघांना मोकळे रान मिळाले आहे, अशी तक्रार बहुजन संग्राम संघटनेने अप्पर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. त्या दोघा कार्यकारी अभियंत्यांची नावे संजय सोनवणे (सातारा पश्चिम विभाग) आणि श्रीपाद जाधव (सातारा) अशी आहेत. त्यांच्या अखत्यारीतील कामांच्या वाटपात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना बाजूला सारून 'टक्का' देणाऱ्या ठेकेदारांनाच झुकते माप दिले जात आहे. त्यामुळे सोनवणे आणि जाधव या जोडगोळीबद्दल सुशिक्षित बेरोजगार अभियंत्या तरुणांमध्ये कमालीचा असंतोष आहे, असे त्या निवेदनात बहुजन संग्रामचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष भीमराव चिलगावकर यांनी म्हटले आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विरोधात त्या अभियंत्या तरुणांच्या संतापाचा उद्रेक होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे.

■ **श्रीपाद जाधव यांना जिल्हा परिषदेतून आणले!**

संजय सोनवणे हे कार्यकारी अभियंता असलेल्या सातारा ( पश्चिम) विभागाच्या अखत्यारीतील वाई उप विभागात श्रीपाद जाधव हे यापूर्वी उप अभियंता राहिलेले आहेत. त्यांना कार्यकारी अभियंता पदी बढती मिळाल्यानंतर त्यांची नेमणूक सातारा जिल्हा परिषदेत झाली होती. पण सोनवणे यांनी जाधव यांना तिथे तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण करू दिला नाही. एक वर्षाआधीच त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सातारा विभागात आणले. या तंत्राने सोनवणे यांनी आपल्या मर्जीतील कार्यकारी अभियंता सातारा विभागात विराजमान करून खुबीने पूर्ण सातारा जिल्ह्याला आपले ' संस्थान ' बनवले आहे, असे बहुजन संग्रामच्या निवेदनात म्हटले आहे.

■ **उच्च पदस्थांना वशीभूत करणारे मोहिनी तंत्र?**

सार्वजनिक बांधकाम खात्यातील मुख्य अभियंत्यांपर्यंतच्या आपल्या साऱ्या वरिष्ठ - उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना वशीभूत करण्याचे भारी मोहिनी तंत्र कार्यकारी अभियंता संजय सोनवणे यांना अवगत

### सोनवणे दुसऱ्यांदा सातारा विभागात !

**कार्यकारी अभियंता संजय सोनवणे यांनी सातारा (पश्चिम) हा 'मलईदार' विभाग दुसऱ्यांदा काबीज केला असून त्यांनी गेल्या सुमारे २० वर्षात आजवर मलईदार विभागच हस्तगत केलेले आहेत. त्यात अमळनेर विभाग (जिल्हा जळगाव), जळगाव विभाग, कोल्हापूर विभाग, पुणे विभाग यांचाही समावेश आहे. 'नॉन एक्झिक्युटिव्ह साईड पोस्टिंग' टाळण्यात त्यांना आजवर नेहमीच यश आले आहे. त्याकडे अप्पर मुख्य सचिवांचे लक्ष वेधण्यात आले आहे.**

# कोल्हापुरात सराईत गुन्हेगाराचा निर्घृण खून

**राजदंड / कोल्हापूर**

शहरामध्ये आज सकाळी शीरविरहित मृतदेह आढळला, तर सायंकाळी रंकाळा तलाव परिसरात एका सराईत गुन्हेगाराचा निर्घृण खून करण्यात आला. या दोन्ही घटनांमुळे कोल्हापूर शहरात एकच खळबळ उडाली आहे.

रंकाळा तलाव परिसरात अजय शिंदे (वय ३0, राहणार यादव नगर) या सराईत गुन्हेगारावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला



चढवण्यात आला. काही क्षणांत सपासप वार करून सहा ते सात आरोपींनी (पान २ वर)

# सातारा कधी वाकत नाही, येथे 'तुतारी'शिवाय काही वाजणारच नाही - खा. श्रीनिवास पाटील


**राजदंड / कोरेगाव**

'सातारा कधी वाकत नाही, त्यामुळे येथे तुतारीशिवाय काही वाजणारच नाही', अशा शब्दांत खासदार श्रीनिवास पाटील यांनी सातारा लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचाच उमेदवार निवडून येईल, असा विश्वास व्यक्त केला.

वडाचीवाडी (ता. कोरेगाव) येथे झालेल्या कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या मेळाव्यात खासदार पाटील बोलत होते. याप्रसंगी आमदार शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, डॉ. भारत पाटणकर, नितीन बानगुडे पाटील, सारंग पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, महिला आघाडीच्या संजना जगदाळे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन मोहिते, ॲड. वर्षा देशपांडे आदी प्रमुख उपस्थित होते.

खासदार पाटील म्हणाले, ''सातारा जिल्हा यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा जिल्हा आहे. त्यांच्यासोबत मी काही काळ घालवला आहे. त्यांच्या विचारांना अनुसरून ज्येष्ठ नेते शरद पवार यांची वाटचाल सुरू आहे. त्यामुळे सातारा लोकसभा मतदारसंघात हातात मशाल घेऊन तुतारी वाजवा.''

आमदार बाळासाहेब पाटील म्हणाले, ''लोकसभेच्या निवडणुकीत सर्वांनी संघटित





राहून महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी योगदान द्यावे. शशिकांत शिंदे हे धाडसाने कोणत्याही संकटाला सामोरे जाणारे नेते आहेत. कोरेगाव मतदारसंघात विधानसभेच्या गेल्या निवडणुकीत असलेले चित्र यावेळी बदलण्याची काळजी सर्वांनी घ्यावी.''

श्री. बानुगडे पाटील म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर हा जिल्हा शरद पवार यांना मानणारा आहे. लोकसभेची ही निवडणूक देशाच्या भविष्याची लढाई आहे. ही लढाई गद्दार विरोधात निष्ठावंतांची आहे. यावेळी भारतीय जनता पक्षाचा पराभव झालाच पाहिजे. अन्यथा, भारत महासत्ता होणारच नाही.''

डॉ. पाटणकर म्हणाले, ''देशात जातीव्यवस्था आणण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला करायचे आहे. चेहरा फक्त नरेंद्र मोदी यांचा आहे. जनतेची केवळ फसवणूक सुरू आहे. ही फसवणूक आम्ही खपवून घेणार नाही. शरद पवार प्रत्यक्ष उमेदवार नसतील; परंतु तेच उमेदवार आहेत, असे गृहीत धरून सर्वांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला निवडून द्यावे.''

आमदार शशिकांत शिंदे म्हणाले, ''आपण सर्व एक झालो, तर कोरेगाव मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मोठे मताधिक्य मिळेल. आपली आघाडी तीन पक्षांसह ३७ विविध संघटनांची आहे. दुसऱ्यांचे पक्ष, घरे फोडून देखील विरोधकांना आत्मविश्वास नाही. त्यामुळे महायुतीचा सुफडासाफ होईल आणि त्यामध्ये सातारा जिल्हा आघाडीवर राहिल.''

यावेळी सुनील माने, डॉ. सुरेश जाधव, ॲड. विजयराव कणसे, ॲड. रविंद्र पवार, सचिन मोहिते, छाया शिंदे, ॲड. वर्षा देशपांडे, अस्लम तडसरकर, भास्कर कदम यांची भाषणे झाली. मेळाव्यास राजकुमार पाटील, ॲड. श्रीकांत चव्हाण, सचिन झांजुर्णे, जयवंत घोरपडे, आनंद जाधव, ॲड. पांडुरंग भोसले, श्रीमंत झांजुर्णे, मनोहर बर्गे, रमेश उबाळे, जगन्नाथ कुंभार, जितेंद्र भोसले, नाना भिलारे, अजय कदम आदींसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट पक्ष, शिवसेना उध्दव ठाकरे गट पक्ष तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### निष्ठावंत शिवसैनिकच विजयाचे शिल्पकार

**आमदार शशिकांत शिंदे म्हणाले, ''विधानसभेच्या गेल्या निवडणुकीत निष्ठावंत शिवसैनिकच कोरेगाव मतदारसंघातील विजयाचे शिल्पकार होते. मात्र, शिवसेनेत झालेल्या गद्दारीमुळे आता पेटून उठलेले निष्ठावंत शिवसैनिक गद्दाराच्या पराभवाचे शिल्पकार ठरणार आहेत.''**

# ‘दिल्ली’च्या नादात ‘गल्ली’त दुष्काळी झळा...!

## ▪ महायुती आकडेमोडीत, महाविकास आघाडी जुळवाजुळवीत तर प्रशासन निवडणूक कार्यात मग्न

**अनिल कदम**

**राजदंड / उंब्रज**

लोकसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर सातारा जिल्ह्यातील जनतेत दुष्काळी झळांची चर्चा सुरु झाली आहे. सर्वपक्षीय राजकारणी मात्र याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहेत. माढा आणि सातारा लोकसभा मतदारसंघात कोणत्या नेत्याला दिल्लीची लॉटरी लागणार यासाठी महायुती व महाविकास आघाडी यांच्यात शह काटशह सुरू आहे.चालूवर्षी कधी नव्हे ते बागायती पट्ट्यात सध्या दुष्काळी झळा बसत आहेत.साखर कारखाण्याची धुरांडी मार्च महिन्यात बंद पडली आहेत. उसाचे उत्पन्न घटले आहे काही ठिकाणी पिके वाळून जाऊ लागली आहेत यात्रा आणि जत्रावर मर्यादा आल्या असून बँकांची कर्जे थकली असून खतांच्या वाढत्या किमती डोक्यावर उन्हाचा तडाखा अपुरे सिंचन यामुळे उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. राजकारण्यांच्या भूलथापांमुळे लोकसभेची निवडणूक जनतेच्या उद्रेकाचा केंद्रबिंदू ठरणार असल्याची चर्चा मतदारांच्यात आहे यामुळे दिल्लीच्या नादात गल्लीत दुष्काळी झळा पसरायला सुरुवात झाली आहे तर महायुती आकडेमोडीत मशगुल तर महाविकास आघाडी जुळवाजुळव करण्यात व्यस्त असल्याने प्रशासन निवडणुकीच्या कार्यात मग्न असल्याने जनता वाऱ्यावर असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे.

संपूर्ण माण,खटाव,तर काही अंशी खंडाळा,कोरेगाव आणि फलटण या भागात दरवर्षी दुष्काळाची झळ बसत असते परंतु २०२३-२४ काळात संपूर्ण जिल्ह्यातील पर्जन्यमान अतिशय अल्प राहिले असून कृष्णा कोयना तसेच इतर नद्या सध्या कमी पाण्यामुळे चर्चेत आहेत धरणांचा जिल्हा म्हणून जिल्ह्याची ओळख असून कृष्णेच्या पाण्यावर हजारो एकर शेती अवलंबून आहे.एप्रिलच्या सुरुवातीस उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला आहे अंगाची लाहीलाही होत असताना पाणीपातळी जलदगतीने घटू लागली आहे यामुळे पिण्याच्या पाण्याची कमतरता जाणवू नये यासाठी पाणीसाठे विहिरी बोअरवेल आरक्षित केले जात असून कॅनॉल व नदीपात्राच्या कडेला असणारे मोटारीचे विद्युत कनेक्शन बंद केले जात असल्याने शेतीची अवस्था बिकट होऊ लागली आहे अशातच लोकसभेची निवडणूक जाहीर झाल्याने राजकारणी दिवसरात्र मिळवणीजुळवणी करण्यात व्यस्त असून जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होऊ लागल्याची तक्रार जनतेतून होत आहे.




महायुतीच्या सरकारने कमी पर्जन्यमान झालेल्या भागात दुष्काळी उपाययोजना अंमलबजावणी करण्यास शासन आदेश निर्गमित केले आहेत. परंतु अंमलबजावणीचे तीन तेरा वाजले असून सर्वच तालुक्यातील प्रमुख अधिकारी निवडणुकीच्या कार्यात मग्न असून जवळपास बराचसा कर्मचारीवर्ग साहेबांच्या देखरेखीसाठी जुंपला असल्याने दिल्लीचा खासदार निवडून देण्यासाठी यंत्रणा कामाला लागली आहे मात्र मतदार राजाची सुरु असलेली ससेहोलपट दुर्लक्षित राहिल्याने 'आमचं ठरलंय'अशी म्हणायची वेळ आली असल्याची चर्चा आहे.यामुळे सरकारने जनतेला दुष्काळी परिस्थितीत सावरण्यासाठी मदतीचा हात देण्यासाठी पाऊले उचलली तरच फील गुड वातावरण निर्माण होणार आहे अन्यथा तिघांच्या वादात तेल गेले तूपही गेले असे म्हणायची वेळ येऊ नये म्हणजे मिळवलं अशीच चर्चा जोर धरू लागली आहे.

### ‘खेळ मांडला... देवा आता...’

**२०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडी आणि महायुती अशी दोन वेगवेगळी सरकारे जनतेला पाहायला मिळाली विकास कामांपेक्षा आपसातील हेवेदावे,सरकार पडापाडी,कोर्टातील वाद,ईडी, सीबीआय यांच्यातील चर्चा सतत होत राहिल्याने जनतेत नाराजी असून आज निवडून दिलेला आमदार खासदार उद्या कोणाच्या पार्टीत जाईल याचा भरोसा नसल्याने जनतेचा मूड काही ठीक दिसत नसून 'खेळ मांडला देवा आता..'म्हणायची वेळ आली असल्याची भावना जनतेतून व्यक्त होत आहे.**


# ‘दादा वहिनी हे तुमचे कुटुंब, आम्हीच इथले उमेदवार’

## काटेवाडीतील घरांवरील पाट्यांनी वेधले लक्ष!

**राजदंड / बारामती**

अजित पवारांना कुटुंबाने जर एकटे पाडले असले तरी काटेवाडीतील काही घरांमध्ये दादा वहिनी हे तुमचे कुटुंब आम्हीच इथले उमेदवार अशा आशयाचे फलक लावण्यात आलेले आहेत. बारामती तालुक्यातील काटेवाडी हे अजित पवारांचे गाव आहे. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी बारामतीतील एका सभेत कुटुंबात मला एकटा पाडले तरी बारामतीकरांनी एकटे पाडू नये, अस आवाहन केले होते. सुप्रिया सुळे यांचा प्रचार करताना अजित पवारांचे कुटुंब वगळता संपूर्ण पवार कुटुंब हे सुनेत्रा पवार यांच्या विरोधात प्रचार करत आहे. त्यामुळे काटेवाडीतील काही घरांमध्ये अशा आशयाचे फलक लावण्यात आलेले आहेत.

'आम्ही जे आता बोर्ड लावलेले आहेत दादा वहिनी हे तुमचे कुटुंब आणि आम्हीच इथले उमेदवार, असे हे बोर्ड लावले आहे. मागचे कारण हेच आहे की दादांनी या गावचा विकास पण केलेला आहे आणि दादांना असे एकटे पाडले जात आहे. अजित दादा एकटेच आहेत आणि बाकीचे सर्व कुटुंब विरोधात आहेत तर ते चुकीचं ठरवण्यासाठी किंवा दादांना साथ देण्यासाठी किंवा हे काटेवाडीकर हे बारामतीकर हेच, आम्ही पण तुमच्या कुटुंबातले आहोत आणि आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहोत हे दाखवण्यासाठी आम्ही हे बोर्ड बोर्ड लावलेले आहेत', असे गावकरी मिलिंद काटे यांनी सांगितले आहे.



सुनेत्रा पवार यांनी २००८ आमच्या इथं काटेवाडी ग्रामपंचायतमध्ये काम करताना एक क्रांतिकारक निर्णय घेतला होता की महिलांचे नाव घरावर असावं. हाच निर्णय आता राज्य शासनाने घेतलेला आहे. आपल्या मुलाच्या पुढे आईचं नाव नंतर वडिलांचं आणि नंतर आडनाव हा जो निर्णय आहे तो २००८ सालीच काटेवाडीचा ग्रामसभेमध्ये घेतलेला होता आणि असे क्रांतिकारक निर्णय यांनी घेतलेला आहे आणि कुटुंबात ते एकटे नाहीत सुनेत्रा वहिनी आणि अजित दादा आणि आम्ही सर्व संपूर्ण गाव त्यांच्या पाठीशी उभा आहोत याची खात्री आम्ही देत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

सध्या बारामती लोकसभेची जोरदार चर्चा सुरु आहे. कारण पवार विरुद्ध पवार अशी ही निवडणूक होत आहे. पवारांचे अख्ख कुटुंब अजित पवारांच्या विरोधात प्रचार करताना दिसत आहे. मात्र काटेवाडी गावकरी अजित पवारांना खास पाठिंबा देताना दिसत आहे.

# कमी मतदानाच्या केंद्रांवर कृष्णानगर, पिरवाडीला जागृती अभियान!




**राजदंड / कोरेगाव**

पन्नास टक्के पेक्षा कमी मतदान झालेल्या केंद्रांवर विशेष मतदान जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत कोरेगाव विधानसभा मतदार संघाच्या अंतर्गत येणाऱ्या कृष्णानगर,पिरवाडी येथील कमी मतदान झालेल्या विविध मतदान केंद्रांच्या अनुषंगाने मतदान जागृती करण्यात आली.

यावेळी कोरेगावच्या गटविकास अधिकारी सुप्रिया चव्हाण, सहाय्यक गटविकास अधिकारी लालासाहेब गावडे, गटशिक्षणाधिकारी धनंजय चोपडे, बालविकास प्रकल्प अधिकारी तथा जागृती विभागाचे समन्वय अधिकारी सुजितकुमार इंगवले पथक प्रमुख यशेंद्र क्षीरसागर उपस्थित होते. या अभियाना अंतर्गत कृष्णानगरचे गोकुळ विद्यालय तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये मेळावे घेण्यात आले.

मेळाव्यांना ब्लॉक लेवल ऑफिसर, तलाठी ,नागरिक ,पालक उपस्थित होते .यावेळी गटविकास अधिकारी चव्हाण म्हणाल्या ‘‘कमी मतदान असणाऱ्या केंद्रांवर विशेष जागृती गरजेची आहे. सुदृढ लोकशाहीसाठी उत्कृष्ट मतदान गरजेचे आहे. ५०% पेक्षा कमी मतदान होणे हे भूषणावह नसून येथील मतदान वाढणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वच नागरिकांनी जागरूक राहावे. स्वतः मतदान करावे आणि इतरांनाही मतदान करण्यास उद्युक्त करावे. यावेळी मतदानाची शपथ सर्व उपस्थित नागरिकांना देण्यात आली. विविध उपक्रम राबविण्याचे यावेळी नियोजन करण्यात आले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी धनंजय चोपडे, बालविकास प्रकल्प अधिकारी सुजितकुमार इंगवले यांनी मनोगत व्यक्त केले. श्री क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. गोकुळ शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा कारखानिस यांनी आभार मानले.

# आदर्की खुर्द येथे डोक्यात कुऱ्हाड घालून एकाचा निर्घृण खून; आरोपी एका तासात जेरबंद

**राजदंड / फलटण**

आदर्की खुर्द (ता. फलटण) गावच्या हद्दीत चिंचेचा मळा नावच्या शिवारात चंद्रशेखर बबनराव निंबाळकर (वय ४८, रा. आदर्की खुर्द) यांनी शेताच्या बांधावरून बोअरवेलची मशीन व पिकअप जीप नेऊन बांध खराब केल्याचा राग मनात धरून आरोपी सयाजी शंकर निंबाळकर याने चंद्रशेखर निंबाळकर यांच्या डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घालून त्यांचा निर्घृण खून केला. या घटनेची फिर्याद मयताचा मुलगा चैतन्य चंद्रशेखर निंबाळकर याने लोणंद पोलीस ठाण्यात दिली.

खुनाचा गुन्हा दाखल होताच पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक आँचल दलाल, फलटणचे उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुशील भोसले यांनी तपास सुरू केला.




आदर्की बु. व आदर्की खुर्द गावाच्या ग्रामसुरक्षा यंत्रणेला आरोपी सयाजी शंकर निंबाळकर (रा. आदर्की खुर्द, ता. फलटण) याचा शोध घेण्याकामी सूचना दिल्या. उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपी हा आदर्की गावात चिंचेचा मळा नावच्या शिवारात ओढ्याजवळ असल्याबाबत माहिती मिळाल्याने लोणंद पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने आरोपीस सापळा रचून पकडले. त्यानंतर आरोपीस अटक करून प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण न्यायालयात हजर केले असता आरोपीस ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली लोणंद पोलीस ठाण्याचे सपोनि सुशील भोसले, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी काटे, पोलीस अंमलदार महेश सपकाळ, नितीन भोसले, नाना भिसे, चंद्रकांत काकडे, विठ्ठल काळे, अभिजित घनवट, बापू मदने, सतीश दडस, सिध्देश्वर वाघमोडे, चालक संजय चव्हाण यांनी केली.

या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि सुशील भोसले करत आहेत.

# साखरवाडी भागातील गुंड मोन्या निंभोरे सहा महिन्यांसाठी तडीपार

**राजदंड / फलटण**

फलटण ग्रामीण पोलीस ठाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार मोन्या उर्फ राकेश संपत निंभोरे (वय २८, राहणार सात सर्कल, साखरवाडी, ता. फलटण, जि. सातारा) याच्यावर शरीराविरुद्ध गंभीर गुन्हे तसेच मालमत्तेविरुद्धचे जबरी चोरीसारखे गुन्हे दाखल आहेत. या आरोपीची साखरवाडी भागात दहशत आहे. हा आरोपी काही महिन्यांपूर्वीच खुनाच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होऊन बाहेर आलेला आहे. तरीसुद्धा त्याच्या छोट्या-मोठ्या कारवाया सुरू होत्या. या आरोपीविरुद्ध फलटण ग्रामीण पोलिसांनी तडीपारीचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत प्रांताधिकारी फलटण यांना पाठवण्यात आला होता. आगामी लोकसभा निवडणूक निर्भय वातावरणात पार पाडावे म्हणून प्रांताधिकारी सचिन ढोले यांनी या आरोपीला सहा महिन्यांसाठी सोलापूर, पुणे ग्रामीण व सातारा जिल्ह्यातून तडीपार केले आहे. बुधवारी या आदेशाची आरोपीवर बजावणी करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक आँचल दलाल, पोलीस उपाधीक्षक राहुल धस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील महाडिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर, पोलीस हवालदार श्रीनाथ कदम, पोलीस नाईक नितीन चतुरे, पोलीस अंमलदार हनुमंत दडस, श्रीकांत खरात, सुजित मेंगावडे, अमोल जगदाळे यांनी केली आहे.

# घंटागाडीवर ‘ऑडिओ क्लिप’द्वारे मतदानाबाबत जनजागृती

**राजदंड / फलटण**

४३ माढा लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषंगाने २५५ फलटण (अ.जा.) विधानसभा मतदार संघामध्ये सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले तसेच तहसीलदार फलटण डॉ. अभिजित जाधव व स्वीप नोडल ऑफिसर एस. के. कुंभार यांच्या मार्गदर्शनखाली मतदारांमध्ये मतदान जनजागृतीचे काम सुरू आहे.

फलटण शहरातील मतदानाचा टक्का वाढण्यासाठी शहरातील कचरा घंटागाडीवर भारत निवडणूक आयोगामार्फत बनवण्यात आलेल्या ‘ऑडिओ क्लिप’द्वारे मतदारांमध्ये मतदान जनजागृतीबाबत अनोखा उपक्रम सुरू करण्याचे नियोजन केले आहे.

त्यानुसार फलटण शहरात उद्या, दि. ४ एप्रिल २०२४ पासून ‘ऑडिओ क्लिप’द्वारे जनजागृती करण्यात येणार आहे.

श्री. तेजस पाटील, उपमुख्याधिकारी नगर परिषद फलटण, स्वीप पथक प्रमुख शहाजी शिंदे तसेच सचिन जाधव स्वीप सहायक अधिकारी व स्वीप टीम कक्ष यांच्या वतीने आयोजन केले आहे.

यामुळे मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती होऊन मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होणार आहे.

पान १ वरून

## सातारा जिल्ह्याला दोघा कार्यकारी अभियंत्यांनी बनवले ‘संस्थान’

असल्याची चर्चा त्यांनी आजवर काम केलेल्या सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांकडून कानी पडत आहे, अशी माहिती भीमराव चिलगावकर यांनी दिली आहे. संजय सोनवणे आणि श्रीपाद जाधव या दोघा कार्यकारी अभियंत्यांची त्वरित उचलबांगडी करून त्यांनी संगनमताने निर्माण केलेले सातारा जिल्ह्यातील त्यांचे संस्थान खालसा करावे, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांच्याकडे बहुजन संग्रामने केली आहे.

## कोल्हापुरात सराईत गुन्हेगाराचा निर्घृण खून

घटनास्थळावरून पलायन केले. रंकाळा चौपाटी परिसरात तलवारी, एडके, कोयते हत्यारे पडली होती.

घटनास्थळी बघ्यांनी एकच गर्दी केली. पोलिसांनी घटनास्थळी गाव घेतली आहे. खुनाचे धागेदोरे शोधण्याचे काम सुरू आहे. हा हल्ला पूर्ववैमनस्यातून झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष आहे.

## रवींद्र धंगेकरांना शिक्षणावरून ट्रोल करणाऱ्यांना सुप्रिया सुळेंचे सडेतोड उत्तर

भाष्य केले आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, विरोधकांनी रवींद्र धंगेकर यांना त्यांच्या शिक्षणावरुन ट्रोल केले. असे ट्रोल करणे चांगले नाही मात्र रवींद्र धंगेकर यांच्या विरोधात भाजपाला बोलायला काहीच नाही, म्हणून ते ट्रोल करत आहेत.

'लोकांना या देशांमध्ये बदल हवाय. भ्रष्टाचाराला लोक थकले आहेत आणि कंटाळले आहेत. बेरोजगारीला कंटाळले आहे. लोक महागाईला कंटाळले आहेत आणि हे सरकार शेतकऱ्यांच्या विरोधात, कामगारांच्या विरोधात महिलांच्या विरोधातील आहेत. त्यामुळे लोकांना आता बदल हवाय. हा बदल घडवून आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत', असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

**दुष्काळाकडे सरकारचे दुर्लक्ष!**

'राज्यामध्ये माझ्या लोकसभा मतदारसंघाचे पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. धरणात पाणी नाही आहे. दुष्काळासाठी मला काम करायचं आहे. दृष्काळासंदर्भात हे असंवेदनशील आहे. दुष्काळाकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे मी राजकारणापेक्षा दुष्काळाकडे लक्ष देत आहे', असंही ते म्हणाले.

**महागाईच्या चटक्यांनी पोळलेल्या जनतेला वीज दरवाढीचा शॉक!**

महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील सामान्य जनता आजपर्यतच्या सर्वाधिक महागाईचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत जनतेला महागाईच्या संकटातून दिलासा देण्यासाठी धोरण आखणे हे सरकारचं कर्तव्य असायला हवं. महाराष्ट्रातील फडणवीस - पवार - शिंदे सरकारने मात्र आधीच महागाईच्या चटक्यांनी पोळलेल्या जनतेला वीज दरवाढीचा शॉक दिला आहे. विजेचा किमान स्थिर आकार तसेच प्रति युनिट वीज दर यात वाढ करून फडणवीस - पवार - शिंदे सरकारने एकूण वीज दरात सरासरी १५म वाढ केली आहे, असे आरोप सुप्रिया सुळेंनी केले आहेत.

# नोंदणी व मुद्रांक विभाग : महसूल संकलनाची विक्रमी ११२ टक्के उद्दिष्टपूर्ती

## मार्चअखेर २८ लाख दस्तांची नोंदणी पूर्ण : नोंदणी महानिरीक्षक हिरालाल सोनवणे

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** महसूल संकलनाच्या उद्दिष्टपुर्तीसाठी विविध उपाययोजना व आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून नियोजनबद्ध प्रयत्नाद्वारे सन २०२३-२०२४ साठी ४५,००० कोटी रुपयांचे महसूल संकलनाचे उद्दिष्ट असताना उद्दिष्टाच्या ११२ टक्के महसूल संकलित केला असून रुपये ५०,५०० कोटी रुपयांची विक्रमी वसुली करण्यात आली. तर मार्चअखेर २८ लाख २६ हजार १४९ इतक्या दस्तांची नोंदणी पूर्ण केली असून सन २०२३-२४ मध्ये वार्षिक बाजारमूल्य दरतक्त्यात कोणतीही दरवाढ न करता महसूल वसुलीचे उद्दिष्ट विभागाने पूर्ण केले असल्याची माहिती राज्याचे नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक हिरालाल सोनवणे यांनी दिली.

मुद्रांक विभागाकडे सन १९८० पासूनची मुद्रांक शुल्काच्या थकीत वसुलीच्या प्रलंबित प्रकरणी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४६ मधील तरतुदीनुसार सक्तीच्या मार्गाने वसुली करण्यासाठी थकबाकीदारांना नोटीस देण्यात आली. बाजारमूल्य दरतक्त्यानुसार मुद्रांक शुल्काची वसुली तसेच अंतर्गत तपासणी, तात्काळ दस्त तपासणी महालेखापाल तपासणीमधील मुद्रांक शुल्काच्या वसुलीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये वसुलीसाठी विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी थकबाकीदारांच्या घरी सुट्टीच्या दिवशी भेटी देऊन वसुलीसाठी पाठपुरावा करुन ही वसुली करण्यात आली.

मुद्रांक शुल्काच्या थकबाकीची काही प्रकरणे उच्च न्यायालय सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत, अशा प्रकरणी स्थगिती उठविणे, तसेच प्रकरणे निर्गत करण्यासाठी सहायक सरकारी वकील यांच्याकडे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी पाठपुरावा करुन प्रकरणे प्राधान्याने निर्गत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडे अभिनिर्णयासाठी दाखल झालेली प्रकरणे प्राधान्याने निर्गत करुन त्याद्वारे मुद्रांक शुल्काची रक्कम मोठ्या प्रमाणात वसूल करण्यात आली.

नोंदणी महानिरीक्षक तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांच्याकडे मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीनुसार दाखल असलेली अपिल व पुनरिक्षण प्रकरणे निर्गत करण्यासाठी विशेष मोहीमेद्वारे मुंबई शहर व उपनगर येथील प्रकरणांची संख्या जादा असल्याने लोकांच्या सोयीसाठी या प्रकरणांची सुनावणी मुंबई येथे घेण्यात येत आहे. सन २०२३-२४ या वर्षात ४६१ अपिल,रिव्हीजन प्रकरणे निर्गत करण्यात आली. त्याद्वारे थकीत मुद्रांक शुल्काची मोठ्या प्रमाणात वसुली झाली.

### अभय योजनेची प्रभावी अंमलबजावणी

**अभय योजनेमध्ये डिसेंबर २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत ६० हजार २५७ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ४३ हजार ६५९ प्रकरणांची निर्गती करण्यात आली आहे. अभय योजनेमध्ये रुपये २७७.९० कोटी एवढी थकीत मुद्रांक शुल्क व दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच सन १९८० ते २००० या कालावधीतील दस्तांवरील थकीत मुद्रांक शुल्क रुपये १ लाखापर्यंत असलेल्या २५ हजार ३१ प्रकरणांमध्ये रुपये ७१.७१ कोटी एवढ्या मुद्रांक शुल्काची व रुपये २३२.६३ कोटी दंडाची माफी देण्यात आली आहे.**

**– हिरालाल सोनवणे, नोंदणी महानिरीक्षक**

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम १० ड (१) अन्वये शासनाच्या ३ जून २०१६ रोजीच्या अधिसुचनेनुसार राज्य शासनाचे सर्व विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय निमशासकीय संस्था इत्यादी कार्यालयांना त्यांच्या यंत्रणामार्फत करण्यात येणाऱ्या कार्यकंत्राट, विकसन करार, टी डी आर हस्तांतरण, भाडेपट्टा इत्यादी दस्तावरील मुद्रांक शुल्क जीआरएएस (ऋठअड) प्रणालीवर भरून त्याबाबत दरमहा मासिक अहवाल मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्याबाबत ७ जुलै २०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या कामी समुचित प्राधिकारी व नोडल अधिकारी नियुक्त करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून त्याबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे स्तरावरून संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

नागरिकांच्या सोयीच्यादृष्टिने दस्त. नोंदणी करण्यासाठी मार्च २०२४ अखेर येणाऱ्या २३,२४ तसेच २९,३० व ३१ मार्च या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालय तसेच सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांची कार्यालये, नोंदणी उपमहानिरिक्षक तसेच नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांची कार्यालये सुट्टयांच्या दिवशी सुरु ठेऊन दस्त नोंदणी करण्यात आली.

शासनाने सन १९८० ते २०२० या कालावधीत निष्पादित करण्यात आलेल्या नोंदणीकृत तसेच अनोंदणीकृत दस्तांसाठी मुद्रांक शुल्क व दंडामध्ये सवलत, माफी देण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३ लागू करण्यात आली आहे. त्यानुसार अभय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील अधिकारी यांची प्रत्येक विभागासाठी समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. समन्वय अधिकारी यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी तसेच दुय्यम निबंधक कार्यालयांना भेटी देवून अभय योजनेमध्ये वसुलीवरील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. तसेच नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून अभय योजनेचा साप्ताहिक आढावा घेण्यासाठी सर्व अधिकारी यांच्या दर आठवड्याला, पंधरावड्याला ऑनलाईन पद्धतीने बैठका घेऊन प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला.

मुंबई येथे होणाऱ्या राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी

# कुडाळच्या इम्तियाज मुजावर यांची वेगवान धावपटू म्हणून निवड

**राजदंड / पाचगणी**

४३ वी राष्ट्रीय मास्टर्स अॅथलेटिक्स मैदानी स्पर्धा दि, २६ एप्रिल ते २८ एप्रिल २०२४ दरम्यान सोमय्या विद्या विहार युनिव्हर्सिटी,क्रिडासंकूल,विद्या विहार (ई) मुंबई. येथे होणार असून हि स्पर्धा विविध वयोगटातील विविध क्रिडा प्रकारात होणार आहे, या स्पर्धेसाठी पुणे जिल्हा मास्टर्स अॅथलेटिक्स संघटनेचे पुरुष ३१ व महिला ३५ अशा ऐकूण ६६ खेळाडूंची निवड करण्यात आली असून यामध्ये साताऱ्याचे जावळी तालुक्यातील कुडाळ गावचे वेगवान धावपटू म्हणून इम्तियाज मुजावर यांची देखील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे पुढील संघ जाहीर करण्यात आला आहे,या राष्ट्रीय स्पर्धेच्या पुरुष कर्णधारपदी सतिश मडके,यांची तर महिला कर्णधार पदी स्नेहा कुदळे, यांची निवड करण्यात आली आहे, संघ पुढील प्रमाणे,



**पुरूष गट** - सतिश मडके, (पुरुष कर्णधार) प्रतिक घोष, स्टिव्हन झुझार्ट, रणजित सावंत, अशोक यादव, अजय कांबळे, आशिष गायकवाड, रामचंद्र जाधव, संतोष खांडीझोड,संजय शिंदे, अविनाश भंडारे, इम्तियाज मुजावर, रोहीत तावडे, राहुल माळी, अनंत टोले, अमर डोळे, प्रसाद पाटील, राम जागडे, मार्क भस्मे, बाबू तांबे, जिग्नेश पटेल,जेम्स ईथियाँग, सुनील महाडिक, मनोज ओव्हाळ, मनोज दिसले, क्लिमेंट ऑगस्टीन, ग्यानसिंग चौहान, बाबू सावर्डेकर, हरिषचंद्र थोरात, धिरेंद्रसिंग यादव,लक्ष्मणराव दहिहांडे.

**महिला गट** - स्नेहा कुदळे (महिला कर्णधार) भावना मेहरा, सोनिया शिंदे, पुनम देवकाते, रिचा सरिन,पल्लवी मावळे, हसिना शेख, ज्योती पासलकर, गुलनाझ खांडीझोड, सुवर्णा शेलार, मनिषा डेंगळे, मनिषा सातपुते, माविस अॅडम, माधुरी भागवत, रेणू शर्मा, रेवती मोरे, स्मिता सकपाळ, स्नेहा भिसे, कुमकुम सिरोही, वैशाली कुलकर्णी, अस्मिता सावंत,अंजली वर्टी, संगिता भांगरे, स्मिता मस्तमरडी, सोनाली दांडेकर, आश्विनी महाजन, मरिना सॅबेस्टीन, सिमा द्रव्यकार, ज्योती शेंडे, वृषाली शिंदे, माधुरी खराडे,रुथ गायकवाड,अनिता दरेकर, रुपाली पाटील, राधिका पाटील, संघ व्यवस्थापक, राम जागडे, सह व्यवस्थापक, पल्लवी मावळे, मार्गदर्शक, संजय शिंदे,यांची निवड करण्यात आली आहे.

# वीज दरवाढ मागे न घेतल्यास धरणे आंदोलन करण्याचा खा. सुप्रिया सुळेंचा इशारा

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** वीज दरवाढ दरवाढ मागे न घेतल्यास धरणे आंदोलन करण्याचा इशारा खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला. सामान्य जनतेला वीज दरवाढीचा ''शॉक'' दिल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीतर्फे आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील सामान्य जनता आजपर्यंतच्या सर्वाधिक महागाईचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत जनतेला महागाईच्या संकटातून दिलासा देण्यासाठी धोरण आखणे हे सरकारचं कर्तव्य असायला हवं. महाराष्ट्रातील फडणवीस - पवार - शिंदे सरकारने मात्र आधीच महागाईच्या चटक्यांनी पोळलेल्या जनतेला वीज दरवाढीचा शॉक दिला आहे, अशा संतप्त भावनाही सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केल्या. विजेचा किमान स्थिर आकार तसेच प्रति युनिट वीज दर यात वाढ करून फडणवीस - पवार - शिंदे सरकारने एकूण वीज दरात सरासरी १५% वाढ केली आहे.

सरकारने केलेल्या या वीज दरवाढीच्या निषेधार्थ महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टी, काँग्रेस, शिवसेना, आम आदमी पार्टी यांच्या वतीने पॉवर हाऊस चौक, रास्ता पेठ येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.



खासदार सुप्रिया सुळे, आमदार रविंद्र धंगेकर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टीचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टीचे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष शेखर धावडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, शिवसेनेचे शहराध्यक्ष संजय मोरे, आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहन जोशी, अभय छाजेड, मुकुंद किर्दत, अशोक हरनावल, विशाल धनावडे, कनव चव्हाणयांच्या प्रमुख उपस्थितीत व महाविकास आघाडीच्या असंख्य कार्यकर्त्यांनी राज्यातील महायुती सरकारचा धिक्कार व्यक्त केला. ''तिघाडी सरकारची मजा जनतेला दरवाढीची सजा, तिघाडी सरकारचा धिक्कार असो, महागाई जोमात जनता कोमात, जनतेच्या खिशाला कात्री हीच मोदींची गॅरंटी'' अशा घोषणांनी संपूर्ण रास्ता पेठ परिसर दुमदुमला होता.

**देशातील जनता अभूतपूर्व अशा महागाईचा सामना करत आहे. देशातील गरीब, मध्यमवर्गीय वर्गाचं जीवन कठीण झालं आहे. अशा परिस्थितीत आपल्या राज्यातील जनतेला महागाईतून दिलासा देणं राज्य सरकारचं प्रथम कर्तव्य आहे. परंतू जनता खड्ड्यात गेली तरी चालेल, परंतू वीज उत्पादन करणाऱ्या अडाणी, अंबानी यांचे खिसे भरले पाहिजेत हेच फडणवीस - शिंदे - पवार सरकारचं धोरण आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत जनता या सत्ताधाऱ्यांना धडा शिकवेल.**

**- प्रशांत सुदामराव जगताप**

# जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची मावळ लोकसभा मतदारसंघातील 'स्ट्राँग रूम'ला भेट

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाअंतर्गत पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदार संघातील स्ट्राँग रुमला भेट देऊन स्ट्राँग रूमच्या सुरक्षेची योग्य खबरदारी घ्यावी, असे निर्देश दिले.



डॉ. दिवसे यांनी आज पिंपरी विधानसभा मतदार संघ कार्यालयांतर्गत ऑटो क्लस्टर, चिंचवड येथील मतदान साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र आणि निगडी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवनातील स्ट्राँग रूम, थेरगाव येथील स्व. शंकर आण्णा गावडे कामगार भवन येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूम, साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र, देहूरोड येथील मतदान केंद्र, सोमाटणे येथील जिल्हा परिषद शाळा मतदान केंद्र व नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्लॉलॉजी तळेगाव दाभाडे येथील स्ट्राँग रूमची पाहणी केली.

त्यांनी स्टाँगरूम व्यवस्थापन, नियोजनाबाबत आढावा घेतला. मतदान यंत्रे ठेवण्यासाठीची व्यवस्था, सीसीटिव्ही यंत्रणा, अग्निशमन व्यवस्था यांची बारकाईने चाचणी करण्यात यावी, तसेच त्याठिकाणी २४७ आवश्यक पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करावी. निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यावे. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. मतदान जनजागृती, अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबतही निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी पिंपरीचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अर्चना यादव, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपआयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका विठ्ठल जोशी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी पिंपरी येथे आयोजित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचीही पाहणी करुन क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी नवले यांनी मावळ विधानसभा मतदार संघातील पूर्वतयारी व नियोजनाबाबत माहिती दिली. मावळ मतदार संघामध्ये एकूण ३९० मतदान केंद्र आहेत. एकूण ४५ सेक्टर ऑफिसर यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच प्रत्येकी ६ फिरती पथके (एफएसटी) व स्थीर निरीक्षण पथके (एसएसटी), ३ व्हीएसटी व २ व्हिडीओ पाहणी पथक (व्हीव्हीटी) व १ उमेदवार खर्च नोंदणी पथक अशी पथके कार्यान्वित करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

चिंचवड मतदार संघामध्ये एकूण ५४९ मतदान केंद्र आहेत. १०० टक्के एपिक रजिस्ट्रेशन झालेले आहे. एकूण ४८ सेक्टर ऑफिसर यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच ६ एफएसटी, ६ एसएसटी, २ व्हीएसटी व १ व्हीव्हीटी व एक अकाउंटिंग टीम अशा टीम कार्यान्वित करण्यात आलेली असल्याचे श्री. जोशी यांनी सांगितले.


पिंपरी विधानसभा मतदारसंघांमध्ये ८५ इमारतीमध्ये एकूण ३९९ मतदान केंद्र असून सर्व मतदान केंद्र ही तळमजल्यावर आहेत, अशी माहिती अर्चना यादव यांनी दिली.

# बारामती येथे निवडणुकीसाठी नियुक्त अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बारामती विधानसभा मतदारसंघात नियुक्त क्षेत्रीय अधिकारी यांचे प्रशिक्षण सहायक निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर आणि तहसीलदार गणेश शिंदे यांच्या उपस्थितीत उप विभागीय अधिकारी कार्यालय, प्रशासकीय भवन, बारामती येथे आयोजित करण्यात आले.

नावडकर म्हणाले, मतदान प्रकियेबाबत भारत निवडणूक आयोगाच्या अद्ययावत सूचनांचे पालन करावे. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट,





बॅलेट युनिट व कंट्रोल ईव्हीएम प्रथम स्तरीय तपासणी (एफएलसी), द्वितीय स्तरीय तपासणी (एसएलसी) बाबत संपूर्ण माहिती घ्यावी. मतदान यंत्राची काळजीपूर्वक जोडणी करावी. निवडणुकीदरम्यान सर्व साहित्य काळजीपूर्वक ताब्यात घेवून त्याचा सूचनेप्रमाणे उपयोग करावा. मतदान प्रक्रीयेबाबत उमेदवार तसेच त्यांच्या प्रतिनिधीस माहिती द्यावी.

तहसीलदार शिंदे यांनी मतदान केद्रांची रचना, केंद्रावरील सुरक्षाव्यवस्था, अभिरूप मतदान (मॉकपोल), ईव्हीएमचे बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट तसेच व्हीव्हीपॅट बाबत विविध टप्प्यावरील तपासणी विविध नोंदवह्या, मतदानाच्यावेळी आदर्श आचारसंहितेचे पालन, ८५ वर्षावरील मतदार आणि दिव्यांग मतदार यांच्याकरीता देण्यात येणाऱ्या टपाली मतदानाची सुविधा आदीबाबत माहिती दिली.

## खडकवासला विधानसभा मतदारसंघात घोषवाक्य स्पर्धा

**नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून देण्यासाठी खडकवासला विधानसभा मतदारसंघात बरटी स्टिचिंग केंद्र, धनकवडी, पुणे येथे विद्यार्थ्यांची घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदानाचे आवाहन करणारी घोषवाक्ये काढली.**

## सासवड शहरात मतदान जनजागृती फेरी

**सासवड शहरात सासवड नगरपरिषदेमार्फत शहरात नगरपरिषदेपासून शिवतीर्थ चौक, नवप्रकाश चौक, अमर चौक, चांदणी चौक, भैरवनाथ चौक, कोडीत नाका, पालखी तळ मैदान परिसर मार्गे मतदान जनजागृती फेरी (रॅली) आयोजित करण्यात आली. रॅलीत मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, शाळांचे शिक्षक, समन्वय अधिकारी अधिकारी पायल पोमण, स्वच्छता निरीक्षक मोहन चव्हाण यांच्यासह वीर बाजी पासलकर शाळा, सावित्री बाई कन्या शाळा, छत्रपती शिवाजी महाराज शाळा, इंदिरा गांधी शाळा, संत नामदेव शाळा आदी शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान करण्याचे आवाहन केले.**

# भारती विद्यापीठ आयएमईडीतर्फे 'सी - गुगली टेक्निकल कॉम्पिटिशन'

**राजदंड / पुणे**

भारती अभिमत विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड आंत्रप्रुनरशिप डेव्हलपमेंट (आयएमईडी) तर्फे 'सी - गुगली २०२४ इंटर कॉलेजिएट टेक्निकल कॉम्पिटिशन' चे आयोजन करण्यात आले आहे. दि.५ एप्रिल रोजी ही स्पर्धा होईल. पूर्णपणे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित या स्पर्धेची नाव नोंदणी देखील क्यू आर कोड द्वारे होत आहे.

भारती विद्यापीठ आयएमईडीचे प्रभारी संचालक डॉ. अजित मोरे , उपप्राचार्य रामचंद्र महाडिक यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. या स्पर्धांमध्ये निंजा कोडींग, ब्रेक द क्रेरी, क्विझर्ड्स ऑफ ओझेड, डिबगिंग ड्युएल अशा तांत्रिक प्रकारांचा समावेश आहे. देशभरातून विविध महाविद्यालयातून विद्यार्थी सहभागी होणार आहेत. डॉ. सत्यवान हेंबाडे, प्रा. दीप्ती देशमुख, डॉ.हेमचंद्र पाडळीकर, डॉ. स्वाती देसाई डॉ. श्वेता जोगळेकर, डॉ. सुजाता मुळीक, संगीता पाटील, प्रतिमा गुंड हे संयोजन करीत आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, सन्मानचिन्हे दिली जाणार आहेत.

# शिवसेनेने 'सांगली'ची जागा काँग्रेसला मोठ्या मनाने सोडावी!

## राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** मुंबईत शिवसेनेच्या स्थापनेचे वेळी महाराष्ट्रात स्व. वसंतदादा पाटील यांचे नेतृत्वाखालील सरकार होते. मुंबईत प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा पुढे आला होता. त्या वेळी 'केंद्रस्थानी असलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या काँग्रेस श्रेष्ठींना, योग्य पध्दतीने वास्तवता समजाऊन, महाराष्ट्राची अस्मिता जपत, शिवसेने सारख्या प्रादेशीक पक्षाची पाया भरणी झाली होती. तेंव्हा तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांनी केलेले अभितपुर्व सहकार्य मौलीक होते व या बाबतचे पुरक वक्तव्य स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी देखील केले होते. काही काळ स्व. वसंतदादा बाजू घेत असल्यामुळे सेनेस काही काळ वसंत सेना देखील संबोधले गेल्याचे ही ऐकिवात येते. मात्र, आज त्याच स्व. वसंतदादा पाटील यांच्या सांगली च्या मतदार संघा साठी काँग्रेसला वारंवार मनधरणी वा याचना करावी लागू नये हीच राज्यातील समस्त काँग्रेसजनांची भावना आहे, असे काँग्रेसचे



राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी म्हटले आहे.

यापुढेही जाऊन, सांगलीचे शिवसेनेचे ऊमेदवार चंद्रहार पाटील यांनी देखील 'काँग्रेसचे संभाव्य ऊमेदवार विशाल पाटील व सांगली'साठी सकारात्मक सहकार्य करण्याची तयारी व मानसिकता ही दर्शवली होती, हे देखील विसरतां कामा नये.

श्रीमती सोनियाजींनी प्रसंगी राज्याच्या हितासाठी, प्रसंगी तत्वांना आवर घालुन, किमान समान कार्यक्रमावर आपल्या नेतृत्वा खालील मविआ सरकारला पाठींबा ही दिला. याचे ही आधाडी धर्माचे पालन करीत सेना नेत्यांनी स्मरण ठेवावे व मोठ्या मनाने, प्रगल्भता दाखवून स्व. वसंतदादा पाटीलांचा ऐतिहासीक वारसा असलेल्या सांगली'ची जागा काँग्रेस'ला सोडावी, असे विनम्र आवाहन केले.

तसेच माजी मंत्री व सांगलीचे युवा नेते डॉ विश्वजीत कदम यांनी प्रकट केलेल्या सांगलीकर - काँग्रेसजनांच्या भावनांचाही आदर करावा, असेही आवाहन केले. आज जर स्व पतंगरावजी कदम असते तर ही वेळ आली असती काय(?) अशी पुस्ती ही गोपाळ तिवारी यांनी जोडली.

तसेच सातारा लोकसभेचे खासदार श्री निवासजी पाटील जर निवडणुक लढवत नसतील, तर सातारा जिल्ह्यातील समस्त काँग्रेसजनांचा आग्रह पाहून ती जागा पवार शरदरावजी साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेस करीता सोडावी, असेही विनम्र व विनंती वजा आवाहन गोपाळ तिवारी यांनी केले आहे.

इंडीया आधाडीच्या जेष्ठ व श्रेष्ठ नेत्यांनी व्यापक देशहित, राज्याचे हित, संविधान व लोकशाही करीता 'ऐक्य भावनेला' सर्वोपरी प्राधान्य देण्याची गरज आहे. तसेच, शरदरावजी पवार साहेब यांनी स्व. राजीव गांधी सोबतचे ऋणानुबंध लक्षात घेऊन, स्व. राजीव गांधींनीच राजकारणात पाचारण केलेल्या पृथ्वीराज चव्हाण यांचे साठी सातारा काँग्रेसला देणे बाबत विचार करावा व इंडीया आघाडीतील कार्यकर्त्यांचे आपल्या विषयीचा आदरभाव आणखीन द्वीगुणीत करावा, अशी प्रेमाची व आग्रही विनंती करणारे आवाहन समस्त महाराष्ट्रातील काँग्रेसजनांतर्फे गोपाळ तिवारी यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे.



# खाद्य संस्कृती जोपासणारे बंट्स बांधव 'पक्के पुणेकर' : मुरलीधर मोहोळ

## ४०० पारसाठी विविध संघटनांचा मोहोळ यांना सक्रिय पाठिंबा

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे ही सांस्कृतिक राजधानी आहे. हॉटेल व्यवसायाच्या निमित्ताने भारताच्या दक्षिण भागातून बंट्स समाजाबांधव म्हणजे ज्यांना 'पुणेकर आण्णा' म्हणून ओळखतो ते पुण्यामुंबईत आले. त्यांनी त्यांचे लक्ष्य फक्त व्यावसायिक म्हणून ठेवले नाही, तर ते पुण्याच्या खाद्य संस्कृतीबरोबरच शहराच्या ऐतिहासिक संस्कृतीशी एकरूप झाल्याने पक्के पुणेकर म्हणून आता त्यांची ओळख झाली आहे. राहिला प्रश्न त्यांच्या समस्या, अडचणीचा तर त्या सोडवण्यासाठीच लोकआम्हाला त्यांचे प्रतिनिधी म्हणून निवडून देतात. लोकप्रतिनीधी म्हणून मी माझ्याकडून शंभर टक्के देत त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, अशा भावना भाजप-महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केल्या.

बंट्स संघ पुणेने आयोजित केलेल्या समाजाच्या मेळाव्यात ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने बंट्स समाजाची भूमिका निश्चित करण्यासाठी बंट्स संघ समाज बांधवांचा मेळावा नुकताच आयोजित केला होता. या मेळाव्याला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील व पुणे लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ खास निमंत्रित होते.

यामेळाव्याला बंट्स संघ पुणेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुण्यात बंट्स समाजाची साडेतीन ते चारहजार व्यावसायिक कुटुंब असून ती व्यवसायाच्या निमित्ताने किमान पंधरा हजार कुटुंबांशी थेट जोडले गेलेले आहेत.

पुणे शहरात हॉटेल व्यवसायाचे व्यवस्थापन करण्याचे बहुतांश काम बंट्स समाजातील व्यावसायिक करत आहेत. चारशेपेक्षा जास्त खासदारांसह देशात पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली तिस-यांदा सरकार आणण्यासाठीच आमच्याकडून प्रयत्न म्हणून आम्ही मुरलीधरजी मोहोळ यांना पाठिंबा देत आहोत असे अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी सांगितले.

आमच्या व्यवसायाचा प्रामुख्याने महापालिका आणि राज्य शासनाशी संबंध येतो. राज्याचे मंत्री म्हणून चंद्रकांतदादा पाटील आणि महापालिकेत नगरसेवक आंणि नंतर महापौर म्हणून काम करताना मुरलीधर मोहोळ यांनी खूपच चांगला, सक्रिय, सकारात्मक सहयोग आम्हा व्यावसायिकांना दिलेला आहे. लोकसभा निवडणुकीसाठी त्यांना पुण्यातून उमेदवारी मिळाली असून यापुढेही त्यांचे आम्हाल पूर्ण सहकार्य मिळेल, असा विश्वास बंट्स संघाच्या पदाधिका-यांनी व्यक्त करत या निवड़णुकीत मोहोळ यांना बंट्स संघातर्फे जाहीर पाठिंबा व्यक्त केला आहे.

## पतित पावन संघटनाही मोहोळ यांच्या पाठीशी !

**पतितपावन संघटनेनेही मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारात सक्रिय सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पतित पावन संघटनेने पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पाठिंबा जाहीर केला आहे. यावेळी शिवाजीराव चव्हाण, जनाभाऊ पेडणेकर, धनंजय क्षीरसागर, विक्रम मराठे, राजाभाऊ शिंदे, स्वप्निल नाईक, गुरु भाऊ कोळी, संतोष शेंडगे, अशोक परदेशी, प्रवीण झोर, रमेश चलवादी यांच्यासह पदाधिकारी आणि संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.**

# ‘जीआय’ मानांकनाचे पाऊल पडते पुढे

**शेती आतबट्ट्याची झाली आहे. ती परवडत नाही, अशी ओरड सुरू असते. त्यात तथ्यही आहे. शेतीचे उत्पन्न दुप्पट करू, अशी घोषणा करून चालत नाही, तर त्यासाठी प्रयत्न करावे लागतात. अलिकडच्या काळात शेतीमालाला चांगला भाव मिळतच नाही. सरकार त्यात हस्तक्षेप करीत असते. या पार्श्वभूमीवर आता शेतकरीच आपआपले मार्ग शोधायला लागले आहेत.**

काही ठिकाणी संशोधकही त्यांच्या मदतीला येत असतात. फिनलंडमध्ये शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे प्रमाण ४९ टक्के आहे;परंतु भारतात हे प्रमाण पाच टक्क्यांच्या आत आहे. शेतीमालाचे मूल्यवर्धन करायचे असेल, तर त्यावर प्रक्रिया करण्याचे प्रकल्प वाढले पाहिजेत; परंतु तसे होताना दिसत नाही. त्यातही अन्य क्षेत्रात जसे स्टार्टअप सुरू झाले आहेत, तसे स्टार्टअप शेती क्षेत्रात सुरू झालेले नाहीत. शेतीमालावर प्रक्रिया करण्याच्या घोषणांची संख्या खूप आहे; परंतु प्रत्यक्षात त्या आलेल्या नाहीत. त्यासाठीच्या विशेष आर्थिक क्षेत्राचे काय झाले, याचा आढावा घ्यायलाही सरकारला वेळ नाही. शहरीकरणाचा वेग वाढत असताना ग्रामीण संस्कृतीकडे दुर्लक्ष होत आहे. शेतीत आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांत शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेतीकडे वाढलेला कल आणि गामीण भागातील वस्तूंना भौगोलिक मानांकन (जीआय) मिळण्याचे वाढलेले प्रमाण हे चांगले लक्षण आहे. ग्रामीण संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, यासाठी शास्त्रज्ञ गणेश हिंगमिरे यांनी राज्यातील चिंच, जांभूळासह पेणच्या गणपतीला पेटंट मिळवून दिले आहे. राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळावी, यासाठी हिंगमिरे करीत असलेले प्रयत्न निश्चितच शेतकऱ्यांना उभारी देणारे आहेत. देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ पेटंट अर्थात जिओग्राफिकल आयडेंटिफिकेशन (जीआय) मिळवून देण्याचे उद्दिष्ट बाळगण्यात आले होते. महाराष्ट्रातील २९ पदार्थांना आधीच पेटंट मिळाले. त्यानंतर महाराष्ट्रातील नऊ आणि बोडोलँडमधील १७ पदार्थांच्या जीआयसाठी अर्ज करण्यात आले. जीआय मिळवण्यासाठी संबंधित पदार्थांचा इतिहास, भूगोल आणि विज्ञान माहीत असणे आवश्यक असते. ‘ॲग्रिकल्चर’ आणि ‘नॉन-ॲग्रिकल्चर’ अशा दोन प्रकारच्या पदार्थांना, वस्तूंना जीआय मानांकन दिले जाते. चीन आणि युरोपच्या तुलनेत भारतात अतिशय कमी जीआय मिळाले आहेत. जीआय करण्यासाठी अर्ज करणे, छाननी करणे, अधिकृतता तपासणे, सादरीकरण करणे आणि निकाल देणे अशी प्रक्रिया पार पाडली जाते. भारतात आणखी नऊ उत्पादनांना भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. यामध्ये आसाममधील गामोचा, तेलंगाणामधील तंदूर रेड ग्रामी, महाराष्ट्रातील अलिबाग येथील पांढरा कांदा यांचाही समावेश आहे. पाच भौगोलिक मानांकन एकट्या कर्नाटक राज्यातील शेतिविषयक उत्पादनांना देण्यात आले आहे. भौगोलिक मानांकन म्हणजे नेमके काय? त्याचे उत्पादन, उत्पादकांना काय फायदा होतो? या सर्व प्रश्नांची उत्तरे जाणून घेतली पाहिजेत. एखादे उत्पादन विशिष्ट भागातच घेतले जात आसेल आणि त्या उत्पादनाला काही विशिष्ट ओळख असेल तर त्याला भौगोलिक मानांकन दिले जाते. कोणत्याही उत्पादनाला भौगोलिक मानांकन मिळाल्यास त्या उत्पादनाचे उगमस्थान निश्चित होते. नफा तसेच गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी त्याचा फायदा उत्पादकांना होतो. भौगोलिक मानांकन हे उत्पादन आणि प्रदेशाशी निगडित आहे. कारण वेगवेगळ्या भौगोलिक परिस्थितीमुळे वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादित केले जाणारे एकच उत्पादन वेगवेगळ्या गुणवत्तेचे असू शकते. त्यामुळे गुणवत्तेची ओळख कायम ठेवण्यासाठी भौगोलिक मानांकन महत्त्वाचे ठरते. भौगोलिक मानांकनामुळे उत्पादकाला अनेक अधिकार प्राप्त होतात. भौगोलिक मानांकनामुळे भेसळयुक्त उत्पादनाची निर्मिती तसेच विक्री करण्यास आळा बसू शकतो. दार्जिलिंग चहाचे उत्पादक अन्य ठिकाणी उत्पादित केलेल्या चहाला ‘दार्जिलिंग’ या शब्दाचा वापर करण्यास मज्जाव करू शकतात. दार्जिलंग येथे निर्माण होणाऱ्या चहाची गुणवत्ता अन्य ठिकाणी उत्पादित केल्या जाणाऱ्या चहाच्या गुणवत्तेपेक्षा वेगळी असते. याच कारणामुळे भौगोलिक मानांकनाच्या नियमांनुसार दार्जिलिंग चहाचे उत्पादक अन्य चहा उत्पादकांना दार्जिलिंग हा शब्द वापरण्यास मनाई करू शकतात. भौगोलिक मानांकनाचा उपयोग हा त्या उत्पादनाच्या संरक्षणासाठी होतो. शेती, अन्न, वाईन, स्पिरिट्स, हस्तकला, औद्योगिक उत्पादने या क्षेत्रांत उत्पादित होणाऱ्या उत्पादनांना भौगोलिक मानांकने दिली जातात. भारतामध्ये सध्या एकूण ४३२ उत्पादनांना भौगोलिक मानांकने आहेत. यामध्ये कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, केरळ या राज्यांना सर्वाधिक भौगोलिक मानांकने मिळालेली आहेत. भौगोलिक मानांकने मिळालेल्यांपैकी ४०१ मूळचे भारतीय तर ३१ उत्पादने परदेशातील आहेत. कर्नाटक, तामिळनाडू यांच्याकडे सर्वाधिक भौगोलिक मानांकने आहेत, तर उत्तर प्रदेशकडे ३५, महाराष्ट्र ३१ आणि केरळ राज्याकडे ३५ भौगोलिक मानांकने आहेत. दरम्यान, भारत सरकारने आगामी तीन वर्षांमध्ये भौगोलिक मानांकनाचे महत्त्व लोकांना समजावे यासाठी जनजागृती करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी सरकारने ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. भारतात भौगोलिक मानांकन मिळालेली अनेक प्रसिद्ध उत्पादने आहेत. यामध्ये बासमती तांतूळ, दार्जिलिंग चहा, चंदेरी फॅब्रिक, म्हैसूर सिल्क, कुल्ली शॉल, कांग्रा चहा, तंजावूर पेंटिंग्ज, अलाहाबाद सुर्खा, फारुखाबाद प्रिंट्स आदी उत्पादनांचा यामध्ये समावेश आहे. आसामच्या सहा पारंपरिक हस्तकला उत्पादने, वस्तूंना भौगोलिक मानांकन (जीआय) टॅग मिळाले आहे. यात बिहू ढोल, जापी (बांबूपासून बनविलेली पारंपरिक टोपी), सारथेबारी येथील बेल धातूची हस्तकला, आसाम अशारिकांडी तेराकोट्टा हस्तकला, आसाम मिसिंग हातमाग उत्पादने आदींचा समावेश आहे. ‘नाबार्ड’, ‘आरओ’ गुवाहाटीच्या मदतीने आसाममधील सहा पारंपरिक हस्तकला उत्पादनांचा जीआय तज्ज्ञ डॉ. रजनीकांत यांनी जीआय टॅग देऊन सन्मान केला आहे. या हस्तकलांना जीआय टॅग मिळण्यासाठी २०२२ मध्ये अर्ज दाखल करण्यात आले होते. महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण बाबीसाठी देण्यात येणाऱ्या भौगोलिक मानांकनामध्ये या वेळी बदलापूर, बाहडोळीची जांभळे, पेणच्या गणेशमूर्ती, लातूर जिल्ह्यातील कास्ती या गावाची कोथिंबीर, निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथील चिंच आणि बोरसुरी येथील तुरीचा समावेश करण्यात आला आहे. जालनाची दगडी ज्वारी, धाराशीव जिल्ह्यातील कुंथलगिरीचा खवा आणि तुळजापूरच्या कवडीला यामध्ये स्थान देण्यात आले आहे. राज्यातून पाठवलेल्या १८ प्रस्तावांना भौगोलिक मानांकन मिळावे, असे प्रयत्न सुरू होते. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील कास्ती भागातील कोथिंबिरीला एक प्रकारचा वेगळा सुगंध आहे. बासमती तांदूळ जसा असतो तसेच या कोथिंबिरीला वेगळा वास आहे. मुंबई, नागपूर या मोठ्या शहरांसह अन्य देशातही कोथिंबीर निर्यात करण्यात येते. निलंगा तालुक्यात बोरसुरी हे गाव आहे. येथील वरण प्रसिद्ध आहे. या भागात बोरसुरी वरणाची मेजवानी करण्यात येते. त्याला डाळ असे संबोधले जात असले, तरी या गावातील वरणात टाकल्या जाणाऱ्या मसाल्यामुळे याला नामांकन मिळाले असल्याचे सांगण्यात येत आहे. पानचिंचोली या गावातील चिंचेचा आकार सहा ते आठ इंचांपर्यंत असतो. गेल्या ३०० वर्षांपासून या गावातील चिंच प्रसिद्ध आहे. या वेळी त्याची वैशिष्ट्ये मांडण्यात आली. लातूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी बी. पी. पृथ्वीराज यांनी या कामासाठी विशेष लक्ष घातले होते. येथील पातडी चिंच उत्पादक संघाच्या वतीने व बोरसुरी येथील तूर डाळ उत्पादक संघाने बोरसुरी तूर डाळ विशेष भौगोलिक मानांकन मिळावे, अशी मागणी केली होती. त्यामुळे या तीन वाणाला आता देशभर वेगळी ओळख निर्माण झाली आहे. धाराशीव जिल्ह्यातील भूम तालुक्यात दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. कुंथल या शब्दाचा अर्थ कुरळा असा होतो. हा भाग डोंगराळ आणि कुरळया केसाच्या आकाराचा असल्याने येथे जनावरांची संख्या अधिक आहे. तुळजापूरला येणारे भाविक कवडयांची माळ घालतात. कवडी स्त्री देवतांचे उपासक आवर्जून वापरतात. शिवाजी महाराज गळयात कवडयांची माळ घालत. जालन्याची ज्वारी ही टणक असून, पक्ष्यांना सहजपणे फोडता येत नाही. या भागातील ज्वारी वैशिष्ट्यपूर्ण आहे. आता या वस्तूंना मानांकन मिळाल्याने त्यांची आंतरराष्ट्रीय ओळख होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात दोन पैसे मिळाले, तर त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

## नियमबाह्य फी आकारणी, द्याव्या लागणाऱ्या पैशामुळे पक्षकार संतापले

**जमीन खरेदीसाठी गेल्या पंधरा दिवसापासून कागदपत्रांची जुळवा - जुळव करून ही सर्व कागदपत्रे एजंटाच्या हातात आणून दिल्यानंतर द्यावी लागणारी फी, यातून निघणाऱ्या त्रुटी आणि त्रुटी दूर करण्यासाठी द्यावा लागणारा पैसा, इंडेक्स उताऱ्यासह कार्यालयात विनाकारण घेतला जाणारा पैसा ही सर्व वादळे पेलून पक्षकाराचा दस्त पूर्ण होतो. दस्त पूर्ण झाल्यानंतरसुद्धा पक्षकाराला सोडले जात नाही, दस्तावर दुय्यम निबंधक कार्यालयाचा शिक्का मारण्यासाठी बाहेर बसलेल्या खाजगी उमेदवाराला मागील तेवढे पैसे द्यावे लागतात.**




**शिरोळ :** दस्तातील त्रुटी दूर करण्यासाठी द्यावी लागणारी हजारोंची खैरात,इंडेक्स उताऱ्यासाठी शासन फी पेक्षा ज्यादा आकारणी, गरज नसताना काढावा लागणारा झोन दाखला आणि त्यासाठी मोजावे लागणारे हजारो रुपये इतकेच नव्हे तर चक्क शिक्के मारण्यासाठी द्यावे लागणारे पैसे या सर्व प्रकारातून दुय्यम निबंधक कार्यालय पक्षकारांकडून अक्षरशः लूट करत असल्याचे चित्र शिरोळ तालुक्यात दिसून येत आहे.

मुद्रांक विभागाच्या अखत्यारीतील दुय्यम निबंधक कार्यालयातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी ऑनलाइन दस्त नोंदणी प्रक्रिया सुरू केली; पण या प्रक्रियेलाही दाद न देता भ्रष्टाचाराची गंगा वाहतच आहे. शिरोळ तालुक्यातील प्रत्येक नागरिकाला या ना त्या कारणासाठी शिरोळ तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयाचे उंबरे झिजवावे लागतात. जमीन खरेदी विक्रीसाठी शासनाच्या भडीमार नियमांचे पालन करण्यात व कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यात पक्षकार अक्षरशः ग्रासलेला असतो. यातच दुय्यम निबंधक कार्यालयात विविध कारणांसाठी द्यावा लागणाऱ्या पैशांमुळे पक्षकार वैतागलेला दिसून येत आहे.

ऑनलाइन फेरफार असल्यामुळे सातबारा वरती नाव नोंदणी करिता तलाठी कार्यालयाकडून इंडेक्सची मागणी कशाला ? तसेच बोजा कमी करण्याकरता इंडेक्सची सक्ती का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. इंडेक्स उताऱ्यासाठी शासनाच्या नियमानुसार ३० रुपये फी आकारली जाते. मात्र या कार्यालयाच्या वतीने एका इंडेक्स उतरण्यासाठी १०० रुपये घेतले जात असल्याने महिनाभरात ७०० ते ८०० इंडेक्स उतारे काढून अक्षरशः पक्षकारांची लूटच करण्यात येते. इतकेच नव्हे तर दस्ताची नक्कल काढण्यासाठी नियमानुसार पानाला ५ रुपये द्यावे लागते मात्र, या कार्यालयात एका पानाला २० रुपये मोजावे लागतात. दुय्यम निबंधक कार्यालयात गेल्या तीन वर्षांपूर्वी एक क्लार्क तर दोन वर्षांपूर्वी एक प्रमुख अधिकाऱ्याला लाचलुचपत विभागाने लाच घेतल्याप्रकरणी कारवाई केली होती. यातूनच या कार्यालयाला असलेली भ्रष्टाचाराची कीड दिसून येते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या कार्यालयात सुरू असलेल्या लुटमारीकडे लक्ष देऊन पक्षकारांची लूट थांबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

गेल्या काही दिवसापूर्वी एका दस्तामध्ये त्रुटी आढळून आल्याने तो दस्त पूर्ण होत नव्हता. अखेर एका एजंटाने चक्क अधिकाऱ्यालाच मॅनेज करून १० हजार रुपये देऊन होत नसलेला दस्त पूर्ण केल्याची चर्चा तहसील कार्यालयावर महिनाभरापासून सुरू आहे. या अगोदरही अनेक चुकीचे दस्त कार्यालयातील अधिकाऱ्यांना पैसे देऊन पूर्ण केल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.

## कोल्हापूरातील अंबाबाईच्या मूर्तीचे नाक, ओठ, हनुवटीला तडे : तज्ज्ञांचा निष्कर्ष



**कोल्हापूर :** करवीर निवासिनी श्री अंबाबाई मूर्तीच्या गळ्याखालच्या भागाची मोठी झीज झाली आहे. तसेच मूर्तीचे नाक, ओठ, हनुवटीवर तडे गेले असून ते २०१५ साली झालेल्या रासायनिक संवर्धनात वापरल्या गेलेल्या साहित्यांच्या अवशेषांची आहे. मूर्तीचा चेहरा व किरीट या भागाचे तातडीने संवर्धन करण्याची गरज असल्याचा निष्कर्ष तज्ञांनी दिला आहे. अंबाबाई मूर्ती संवर्धनासंबंधीचा दावा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तरकोल्हापूरयांच्यासमोर सुरू आहे. या दाव्यात वादी गजानन मुनीश्वर व इतर यांनी पुरातत्व खात्याच्या निवृत्त अधिकाऱ्यांकडून मूर्तीची पाहणी व्हावी अशी मागणी केली होती. न्यायालयीन आदेशानंतर पुरातत्त्व खात्याचे निवृत्त अधिकारी आर. एस. त्र्यंबके व विलास मांगीराज यांनी १४ व १५ मार्च रोजी केलेल्या पाहणीचा अहवाल गुरुवारी न्यायालयात सादर झाला.

आठ पानाच्या या अहवालात त्यांनी २०१५ साली अंबाबाई मूर्तीच्या संवर्धन प्रक्रियेसाठी वापरले गेलेले साहित्य मूळ पाषाणाशी जुळवून घेऊ न शकल्याने त्याचे तडे जाऊन थर निघत असल्याचा निष्कर्ष काढला आहे. तसेच मूर्तीवरील अन्य ठिकाणच्या लेपाला देखील तडे असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. या सुनावणीला ड. नरेंद्र गांधी, ड. ओंकार गांधी, वादी गजानन विश्वनाथ मुनीश्वर, अजिंक्य मुनीश्वर, लाभेश मुनीश्वर, प्रतिवादी दिलीप देसाई, ड. प्रसन्न मालेकर उपस्थित होते. उपाय काय ?अंबाबाईची मूर्ती भक्कम करण्यासाठी ईथील सिलिकेटचे द्रव्य वापरून हे तडे मुजवता येतील. मूर्तीला जुळवून न घेणारे जुन्या संवर्धन प्रक्रियेतील साहित्याचे सगळे थर रासायनिक संवर्धन प्रक्रियेने काढून नव्याने थर द्यावे लागतील. अखेरीला रंगविरहित संरक्षक द्रव्याचा थर देऊन मूर्ती सुरक्षित करावी लागेल.

### मूर्ती हाताळण्यासंबंधीचे नियम

- वेळोवेळी मूर्तीचे निरीक्षण करून योग्य ती काळजी घेणे.-मूर्तीला स्नान न घालता नाजूक सुती कापडाने पुसून घेणे.
- मूळ मूर्तीला पुष्पहार वगैरे न घालता केवळ उत्सव मूर्तीला फुलांचे हार घालणे.-गर्भगृहातील संगमरवर काढणे .-कीटकांचा उपद्रव होऊ नये यासाठी उपाययोजना करणे.- तसेच आर्द्रता व तापमान यांचे नियंत्रण करणे
-अलंकार व किरीट घालताना योग्य ती काळजी घेणे

## घोगाव योजनेची जलवाहिनी फुटल्याने पाण्याचा ठणठणाट

**विटा :** विटा शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या नगरपालिकेच्या घोगाव नळपाणी पुरवठा योजनेची जलवाहिनी बलवडी (भा.) येथे फुटल्याने गेल्या दोन दिवसांपासून शहरात पाण्याचा ठणठणाट आहे. जलवाहिनी दुरुस्त होईपर्यंत शहरात तीव्र स्वरूपाची पाणीटंचाई निर्माण होणार आहे.

दरम्यान, अनेक मालमत्ताधारकांना खासगी पाण्याचे टँकर मागवावे लागत असल्याने टँकर चालक खुश झाले आहेत. पलूस तालुक्यातील घोगाव येथील कृष्णा नदीपात्रातून विटा शहराला नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जाते. नगरपालिका नागरिकांना एक दिवसाआड पाणीपुरवठा करीत असली तरी ते पाणी पूर्ण दाबाने मिळत नाहीच, शिवाय पाणीपुरवठ्याचे वेळापत्रकही बिघडले असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. मात्र या योजनेची बलवडी येथील पवार मळ्याजवळ मंगळवारी रात्री मुख्य जलवाहिनीच फुटली आहे. परिणामी, लाखो लिटर पाणी वाया गेले आहे. ही जलवाहिनी फुटल्याने विटा शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद आहे. या फुटलेल्या जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी विटा नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी गेल्या दोन दिवसांपासून बलवडी येथे काम करीत आहेत.



## निसर्गमित्र अवधुत पाटील यांचा पर्यावरणपूरक उपक्रम

**गारगोटी :** मार्च, एप्रिल, मे महिन्या दरम्यानच्या प्रखर उन्हाळ्याच्या दिवसात पक्षी पाण्याअभावी कासावीस असतात. जंगल भागात तर सहजासहजी पाणी उपलब्द होत नाही, प्रसंगी पक्षी पाण्याविना मृत्यूमुखीही पडतात. यासाठी पक्षी संवर्धन हा उद्देश घेऊन पाणपोई हा पर्यावरणपूरक उपक्रम निसर्गमित्र अवधुत पाटील यांनी योजिला आहे,. असे उपक्रम महाराष्ट्रभर निसर्गमित्र, पक्षीप्रेमी राबवत आहेत.

आपणही निसर्ग, पशुपक्षी, वन्यजीवांचे काही देणं लागतोय ह्या जाणिवेने पक्षांसाठी पाण्याने भरलेले पात्र ठेऊयात, त्यात दररोज न चुकता पाणी घालूया, जेणेकरून पाण्याविना तडफडून मरणाऱ्या पक्षांना जीवदान मिळेल.

## सण व उत्सव साजरे करताना आचारसंहितेचे पालन करा : अप्पर पोलीस अधीक्षक जयश्री देसाई




**पन्हाळा येथे निवडणूकीच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत बोलताना अप्पर पोलिस अधीक्षक जयश्री देसाई, प्रांत समीर शिंगटे व मान्यवर**

**पन्हाळा :** सध्याचा काळ हा निवडणूकीचा आहे त्यामुळे पन्हाळा पोलिस स्टेशनच्या हद्दीतील सर्वच गावात या कालावधीत यात्रा, आंबेडकर जयंती, गुढीपडावा, रमजान ईद यासारखे धार्मिक सण व सामाजिक उत्सव साजरे होणार आहेत.

ते सण व उत्सव साजरे करत असताना आचारसंहितेचे काटेकोर पालन करा असे आवाहन अप्पर पोलिस अधीक्षक जयश्री देसाई यांनी केले. त्या पन्हाळा येथे निवडणूकीच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत बोलत होत्या. पन्हाळा उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे यांनी सण, उत्सव साजरे करतेवेळी आचार संहितेचे भान ठेवा. विशेष करून यात्रेच्या वेळी लावले जाणारे ध्वनीक्षेपक, मनोरंजनाचे कार्यक्रमा साठी योग्यत्या परवानग्या घ्या. व या सर्वच कार्यक्रमासाठी असणारी बंधने काटेकोर पणे पाळा .हा आचारसंहितेचा कालावधीत असल्याने यामध्ये होणारे गुन्हे जास्त कडक असतात. त्यामुळे सर्वांनी या कालावधीत कोणताही गुन्हा दाखल होणार नाही याची दक्षता घ्यावी.येथे सर्वच समाजात असलेले ऐक्य आदर्शवत आहे.त्यामुळे येथे कोणताही अनुचित प्रकार घडत नाही. हीच परंपरा या आचारसंहितेच्या कालावधीत कायम ठेवावी, असे आवाहन केले

तर शाहूवाडी उपविभागीय पोलिस अधिकारी आप्पासाहेब पवार ,पन्हाळा पोलिस निरीक्षक महेश इंगळे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी माजी नगराध्यक्ष असिफ मोकाशी, चंद्रकांत गवंडी, माजी पोलिसपाटील भीमराव काशीद, सर्व पोलिस पाटील, सरपंच व नागरिक उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# भारत पाकिस्तान लवकरच भिडणार, विराट कोहलीच टी-२० वर्ल्ड कपमध्ये किंग, बाबर आझमच्या नावावर किती धावा?

भारतात सध्या क्रिकेट विश्वात आयपीएलची चर्चा सुरु आहे. आयपीएलमध्ये आज सोळाव्या मॅचमध्ये दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात लढत होणार आहे. आयपीएलचा समारोप २६ मे रोजी होणार आहे. यानंतर पाच दिवसांनी टी-२० वर्ल्ड कप सुरु होणार आहे. आयसीसीनं टी-२० वर्ल्डकपचं पोस्टर देखील जारी केलं आहे. यामध्ये विराट कोहलीला स्थान देण्यात आलं आहे. विराट कोहलीनं वैयक्तिक कारणांमुळं दोन महिन्यांचा ब्रेक घेतला होता. आता विराट कोहली आरसीबीकडून आयपीएलमध्ये खेळत आहे. विराट कोहली टी-२० वर्ल्ड कपमध्ये भारतीय संघात असेल की नाही याबाबत चर्चा सुरु आहेत. मात्र, टी-२० वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक धावा विराट कोहलीच्या नावावर आहेत. विराट कोहली आणि भारताचा पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानच्या बाबर आझम या दोघांची तुलना केली जाते. आपण विराट कोहली आणि बाबर आझमची टी-२० वर्ल्ड कपमधील कामगिरी कशी आहे हे जाणून घेऊयात.

विराट कोहलीनं टीम इंडियाकडून २०१२ च्या टी-२० वर्ल्डकपमध्ये पहिल्यांदा सहभाग घेताल होता. त्यानंतर विराट कोहलीनं टी-२० वर्ल्ड कप पाचवेळा खेळला आहे. विराटनं आतापर्यंत टी-२० वर्ल्ड कपमध्ये २७ मॅच खेळल्या असून त्याच्या नावावर ११४१ धावा आहेत. टी-२० वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक धावा विराटच्या नावावर आहेत. विराटनं टी-२० वर्ल्ड कपमध्ये ८१.५ च्या सरासरीनं धावा केल्या आहेत. टी-२० मध्ये खेळाडूंना ४० च्या सरासरीनं धावा करणं देखील अवघड असतं तिथं विराट कोहलीनं ८० च्या सरासरीनं धावा केल्या आहेत. २७ मॅचपैकी २५ डावात त्यानं १४ अर्धशतकं केली आहेत. विराट कोहलीचं टी-२० वर्ल्ड कपमधील प्रदर्शन चांगलं राहिलं आहे.

**बाबर आझम विराट कोहलीच्या तुलनेत कुठं?**

पाकिस्तानच्या बाबर आझमनं २०२१ मध्ये पाकिस्तानकडून पहिल्यांदा टी-२० वर्ल्ड कप खेळला होता. बाबर आझमनं आतापर्यंत टी-२० वर्ल्ड कप मध्ये १३ मॅच खेळल्या आहेत यामध्ये त्यानं ४२७ धावा केल्या आहेत. बाबर आझम सरासरीच्या बाबत विराटच्या खूप मागं आहे. विराट कोहलीची सरासरी ८१ पेक्षा अधिक आहे त्याचवेळी बाबर आझमची सरासरी ३५.५८ इतकी आहे. कोहलीचं टी-२० वर्ल्ड कपमधील स्ट्राइक रेट १३१.३ इतकं असून बाबर आझमचं स्ट्राइक रेट ११४.४७ इतकं आहे. बाबर आझमनं टी-२० वर्ल्ड कपमध्ये ५ अर्धशतकं केली आहेत.

दरम्यान, भारत आणि पाकिस्तान यांच्यात ९ जूनला टी-२० वर्ल्ड कपमध्ये ग्रुप स्टेजमधील मॅच होणार आहे.

# रवी शास्त्री हार्दिकच्या समर्थनार्थ मैदानात! मुंबईच्या चाहत्यांवर संतापून म्हणाले, 'तो सुद्धा एक...'



भारताचे माजी क्रिकेटपटू तसेच माजी प्रशिक्षक रवी शास्त्रींनी मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांची संघाचा नवा कर्णधार हार्दिक पंड्यासंदर्भात संयम ठेवण्याची गरज असल्याचं म्हटलं आहे. तसेच मुंबई इंडियन्सच्या सामन्यांदरम्यान पंड्यासंदर्भातील मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांची वर्तवणूक योग्य नसल्याचं सांगतानाच तातडीने हे असलं वागणं चाहत्यांनी थांबवायला हवं अशी अपेक्षा रवी शास्त्रींनी व्यक्त केली आहे. मुंबई इंडियन्सने २०२४ च्या प्लेअर्स ट्रेडअंतर्गत गुजरात टायटन्सच्या संघाचे नेतृत्व करणाऱ्या हार्दिक पंड्याला संघात सहभागी करुन घेतले. मात्र पंड्याच्या नेतृत्वाखाली मुंबईने यंदाच्या पर्वातील त्यांचे पहिले तिन्ही सामने गमावेल आहेत. रवी शास्त्रींनी हार्दिकला पाठिंबा दर्शवला आहे.

**तो तुमच्यासारखा माणूसच आहे**

हार्दिक पंड्याचं नेतृत्व चाहत्यांना फारसे पटलेले नाही. मुंबईचा यंदाच्या पर्वातील पहिला सामना अहमदाबादमध्ये झाला. त्या सामन्यात मुंबईच्या चाहत्यांनी हार्दिकची हुर्यो उडवली. त्यानंतर सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यातही हार्दिकला मैदानातील चाहत्यांनी ट्रोल केले. रविवारी मुंबईतील वानखेडे स्टेडियममधील मैदानात झालेल्या राजस्थान विरुद्धच्या सामन्यात होम ग्राऊण्डवरही चाहत्यांनी हार्दिकची हुर्यो उडवली. मात्र हे सारं रवी शास्त्रींना पटलेले नसून त्यांनी चाहत्यांच्या वागणुकीबद्दल संताप व्यक्त केला आहे. काहीही झाले तरी हार्दिक हा संघाचा नवा कर्णधार आहे. तसेच चाहत्यांनी हे ही लक्षात घेतले पाहिजे की हा अष्टपैलू खेळाडू 'तुमच्यासारखा माणसूच आहे,' असे रवी शास्त्रींनी चाहत्यांना सांगितले आहे.

**थोडा विचार करा आणि शांत व्हा**

''तुम्ही अनेक वर्ष संघाला पाठिंबा दिला. अगदी २-३ सामन्यांमध्ये मुंबईचा संघ काही वाईट संघ होणार नाही. हा संघ ५ वेळा जेतेपद पटकावलेला संघ आहे. संघाला नवा कर्णधार मिळाला म्हणून काय झाले. थोडा संयम ठेवा. तुम्ही हात धुवून ज्याच्या मागे लागला आहे तो सुद्धा तुमच्यासारखा एक माणूसच आहे. सगळ्या गोंधळानंतर त्यालाही रात्री सुखाने झोप लागली पाहिजे. याबद्दल थोडा विचार करा आणि शांत व्हा,'' असा सल्ला रवी शास्त्रींनी 'स्टार स्पोर्ट्स'वर बोलताना मुंबईच्या चाहत्यांना दिली.

**हार्दिक आणि मुंबईला सल्ला**

''हार्दिकला सल्ला द्यायाचे झाले तर इतकेच सांगेल की त्या संयम ठेवावा, दुर्लक्ष करावं आणि आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करावे. मागील काही सामने चांगले गेले नाहीत पण हा फार उत्तम संघ आहे. ते ३-४ सामने जिंकल्यानंतर लोक सारं विसरुन जातील. तुम्ही नक्कीच जिंकाल आणि परिस्थिती नक्कीच बदलेल,'' असे रवी शास्त्रींनी हार्दिक आणि मुंबईच्या संघाला सल्ला देताना सांगितले. रवी शास्त्रींनी या माध्यमातून ट्रोलिंगचा शिकार होणाऱ्या हार्दिकला पाठिंबा दिला आहे.

## आपलं मनोरंजन

# 'शैतान'ची बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई; निर्मात्यांनी शेअर केली पोस्ट




अभिनेता अजय देवगण आणि आर. माधवन स्टारर 'शैतान' रिलीज होऊन जवळपास एक महिना झाला आहे. हा चित्रपट गेल्या महिन्यात ८ तारखेला थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. 'शैतान' चित्रपट भारतीय बॉक्स ऑफिसवर यशस्वी झाला असून याला परदेशातही प्रचंड प्रेम मिळत आहे. या चित्रपटानं जगभरात बॉक्स ऑफिसवर २०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. दरम्यान 'शैतान'नं देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १४० कोटींचा आकडा गाठला आहे. विकास बहल दिग्दर्शित 'शैतान' चित्रपटाला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला आहे.

'शैतान'ची बॉक्सवर तुफान कमाई : या चित्रपटानं पहिल्या दिवशी भारतीय बॉक्स ऑफिसवर १४.७५ कोटींची कमाई केली. यानंतर 'शैतान'नं पहिल्या आठवड्यात ८१.३१ कोटींची कमाई केली. दुसऱ्या आठवड्यात ३६.०८ कोटी रुपये आणि तिसऱ्या आठवड्यात २०.०४ कोटी रुपये कमावले. तर, गेल्या वीकेंडमध्ये या चित्रपटाची कमाई ४.३४ कोटींची झाली आहे. अशाप्रकारे या चित्रपटानं देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर एकूण १४२.०६ कोटी रुपयांचा आकडा गाठला आहे. आता हा चित्रपट भारतीय बॉक्स ऑफिसवर १५० कोटी लक्ष्य गाठण्याच्या प्रयत्नात आहे. या चित्रपटामध्ये अजय देवगण आणि आर. माधवन, साऊथ अभिनेत्री ज्योतिका आणि जांकी बोडीवालाच्या अभिनयाचं खूप कौतुक होत आहे.

जगभरातील कलेक्शन : ८ मार्च रोजी प्रदर्शित झालेल्या 'शैतान'च्या ओव्हरसीज कलेक्शनबद्दल बोलायचं झालं तर १५ मार्चपर्यंत या चित्रपटाची कमाई ११७.४७ कोटींवर पोहोचली होती. तर २२ मार्चपर्यंत १५० कोटींचा टप्पा ओलांडल्यानंतर 'शैतान'नं एकूण जगभरात १६८.४२ कोटींची कमाई केली होती. यानंतर गेल्या आठवड्यात या चित्रपटानं जगभरात १८७.८२ कोटींचा व्यवसाय केला. नुकतेच निर्मात्यांनी चित्रपटाच्या नवीन कलेक्शनबद्दल अपडेट जारी केले आहे. 'शैतान' चित्रपटानं जगभरात २०१.७३ कोटींची कमाई केली. आता हा चित्रपट ८ मे रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर धडकण्यासाठी सज्ज आहे. हा चित्रपट काळ्या जादूवर आधारित आहे.

# अभिनेता प्रतीक निकम ह्याने मालिकेसाठी घोडेस्वारी शिकण्याचा अनुभव शेअर केला



शेमारू मराठीबाणाच्या 'जोगेश्वरीचा पती भैरवनाथ' या मालिके मधील अभिनेता प्रतीक निकम ह्याने मालिकेसाठी घोडेस्वारी शिकण्याचा अनुभव शेअर केला

'जोगेश्वरीचा पती भैरवनाथ' या लोकप्रिय मालिकेमध्ये भैरवनाथाच्या भूमिकेसाठी ओळखल्या जाणाऱ्या प्रतीक निकम याने मालिकेच्या एका सीक्वेन्ससाठी एक रोमांचक नवीन आव्हान स्वीकारले आहे, ज्यामध्ये त्याचे पात्र भैरवनाथ घोड्यावर स्वार होत असल्याचे दाखवण्यात आले आहे. सत्यता सुनिश्चित करण्यासाठी आणि दृश्यात वास्तववाद आणण्यासाठी, प्रतीकने घोडेस्वारीच्या कलेमध्ये प्रभुत्व मिळविण्यासाठी स्वतःला समर्पित केले आहे.

आपल्या अनुभवावर विचार करताना, प्रतीक निकम म्हणतो, एक अभिनेता म्हणून मी माझ्या मर्यादा ओलांडण्यावर नेहमीच विश्वास ठेवला आहे आणि 'जोगेश्वरीचा पती भैरवनाथ' साठी घोडेस्वारीमध्ये प्रभुत्व मिळवणे खरोखरच आनंददायी होते. अनुभवी घोडेस्वारी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मी प्रशिक्षण सत्रे घेतली. प्रत्येक दिवसागणिक, माझी स्वारी कौशल्ये सुधारत गेली, हळूहळू घोड्यावर नियंत्रण ठेवण्याचा आत्मविश्वास वाढला.

तो पुढे म्हणाला, या शोने मला भैरवनाथशी अधिक खोलवर जोडण्याची परवानगी दिली आहे. शिकण्याचा आणि वाढण्याचा हा एक अविश्वसनीय प्रवास आहे आणि आमच्या दर्शकांच्या स्क्रीनवर सत्यता आणण्याच्या संधीबद्दल मी कृतज्ञ आहे.

अश्वारूढ कौशल्यात नवोदित असूनही, प्रतीकने उत्साह आणि निर्धाराने संधी स्वीकारली. त्याच्या परिश्रमाचे फळ मिळाले कारण त्याने घोड्यावर स्वार होण्याच्या, कलाकार आणि क्रूला त्याच्या नवीन प्रतिभेने प्रभावित केले.

# कोणाला न सांगता लपूनछपून लग्न केलेल्या तापसी पन्नूच्या लग्नाचा व्हिडिओ लीक झालाच

बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नू सध्या आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. तापसी २३ मार्च २०२४ रोजी प्रियकर मॅथियास बो याच्यासोबत लग्नबंधनात अडकली असल्याचं वृत्त समोर आलं होतं. पण अभिनेत्रीच्या लग्नसोहळ्याचे फोटो किंवा व्हिडीओ समोर आले नव्हते. तसेच अभिनेत्रीने याबद्दल काहीही प्रतिक्रिया दिलेली नव्हती. तापसी पन्नू आणि मॅथियास बो यांनी कुटुंबीय आणि मोजक्या पाहुण्यांच्या उपस्थितीत गुपचूप लग्न केलं होतं. आता कोणाला न सांगता लपूनछपून लग्न केलेल्या तापसी पन्नूच्या लग्नाचा व्हिडीओ लीक झाला आहे. तापसीच्या लग्नसोहळ्याचे फोटो आणि व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.




तापसी पन्नूचा वेडिंग व्हिडीओ सध्या नेटकऱ्यांचं लक्ष वेधून घेत आहे. या व्हिडीओमध्ये अभिनेत्री नववधूच्या रुपात दिसून येत आहे. एन्ट्रीला अभिनेत्री डान्स करताना दिसून येत आहे. तर दुसरीकडे मॅथियास लग्नमंडपात तापसीची वाट पाहताना दिसून येत आहे. नववधूच्या रुपात तापसी खूपच सुंदर दिसत आहे. लाल रंगाचा ड्रेस, लाल रंगाच्या बांगड्या आणि काळ्या रंगाच्या गॉगलमध्ये अभिनेत्री खूपच स्टायलिश दिसत आहे.

तापसी पन्नू जीत सिंह आण चित्रा सिंह यांच्या 'कोठे ते आ माहिया' या गाण्यावर थिरकताना दिसून येत आहे. त्यानंतर समोर असलेल्या मॅथियासला ती मिठी मारते आणि वरमाळा घालते. त्यानंतर दोघेही एकत्र डान्स करतात. व्हिडीओच्या शेवटी मॅथियास फुलांनी सजवलेल्या सायकलवर बसलेला दिसून येत आहे. तापसी पन्नू आणि मॅथियास यांनी पंजाबी रिती-रिवाजानुसार लग्न केलं आहे.

**तापसी पन्नू 'या' ठिकाणी अडकली लग्नबंधनात**

मीडिया रिपोर्टनुसार, तापसी पन्नू आणि मॅथियास बो उदयपूरमध्ये लग्नबंधनात अडकले आहेत. शाही थाटात लग्न करण्यापेक्षा कुटुंबीय आणि जवळच्या मित्र-मंडळींच्या उपस्थितीत लग्न करणं तिने पसंत केलं आहे. २० ते २३ मार्च दरम्यान त्यांचा लग्नसोहळा सुरू होता. तापसी पन्नू आणि मॅथियास गेल्या १० वर्षापासून रिलेशनमध्ये होते. १० वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर २३ मार्च २०२४ रोजी ते लग्नबंधनात अडकले. तापसी पन्नू आणि मॅथियास यांची पहिली भेट २०१३ मधअये इंडियन बॅडमिंटन लीगच्या उद्घाटनादरम्यान झाली होती. दोघांनी कधी त्यांचं नातं अधिकृतरित्या जाहीर केलं नाही. तापसी पन्नूने अनेकदा मॅथियाससोबतचे फोटो सोशल मीडियावर शेअर केलेले आहेत. लग्नानंतर तापसीने धुळवडीचा सण साजरा केला.

# आतड्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी 'या' बाबी आवश्यक; अन्यथा पोटाची दुर्दशा

आपल्या आतड्यांचे आरोग्य चांगले राखणे हेदेखील महत्त्वाचे आहे. चांगल्या आरोग्यासाठी आता काय खावे, काय खाऊ नये याबाबत अनेक जण सजग आहेत. या पार्श्वभूमीवर आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी आपण कसे जेवावे हे माहीत असणेही गरजेचे आहे. जर तुम्हाला इरिटेबल बॉवेल सिंड्रोम (खइड) नियंत्रित करायचा असेल, तर तुमच्या आहारात अधिक तंतुमय पदार्थ असण्याची गरज आहे.

इरिटेबल बॉवेल सिंड्रोम हा एक सामान्य विकार आहे; जो मोठ्या आतड्याला प्रभावित करतो. या विकारात काही लक्षणे तुम्हाला दिसू लागतात; ज्यामध्ये ओटीपोटात दुखणे, पोटात गोळा येणे, गॅस (वायू धरणे) व बद्धकोष्ठता किंवा दोन्हींचा समावेश असतो, असे एका नवीन अभ्यासानुसार दिसून आले आहे. त्याविषयी गुरुग्राम येथील सी. के. बिर्ला हॉस्पिटलचे डॉ. अनुकल्प प्रकाश यांनी माहिती दिली असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.

विशेषत: आतड्यांचे आरोग्य, तसेच सामान्य आरोग्य राखण्यासाठी आहारातील तंतुमय पदार्थांच्या भूमिकेकडे बारकाईने लक्ष दिले आहे. वनस्पती-आधारित खाद्यपदार्थांमध्ये तंतुमय पदार्थ आणि एक प्रकारची हळूहळू सोडली जाणारी कर्बोदके असतात, हे पचनाच्या मदतीसाठी आवश्यक आहे. परंतु, हा नवीनतम अभ्यास तंतुमय पदार्थ आणि खइड यांच्यातील अधिक निश्चित दुवा स्थापित करतो.

**आतड्यांच्या आरोग्यासाठी तंतुमय पदार्थ का महत्त्वाचे?**

तंतुमय पदार्थांच्या सेवनाने पचनक्रिया चांगली होते आणि आतड्यांचे आरोग्य चांगले राहते. साधारणपणे फळे, भाज्या, धान्ये इत्यादी पदार्थांमधून शरीराला तंतुमय घटकाचा पुरवठा होतो. शरीरातील हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी प्रणाली, आतडे, रक्तातील शर्करेची पातळी राखण्यासाठी तंतुमय पदार्थ हा एक आवश्यक घटक आहे.

तंतुमय पदार्थयुक्त अन्न हे आतड्याच्या आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे वारंवार सांगितले गेले आहे. संपूर्ण धान्य, शेंगदाणे व भाज्या यांसारख्या खाद्यपदार्थांमध्ये तंतुमयता हा घटक जास्त असतो. त्यामुळे अशा असे खाद्यपदार्थ पचनसंस्थेद्वारे अन्नाच्या संक्रमणास गती देतात. त्यामुळे बद्धकोष्ठतेचा धोका कमी होऊन, आतड्यांसंबंधीच्या नियमित हालचालींना प्रोत्साहन मिळते.

**तंतुमय पदार्थांच्या कमतरतेमुळे काय होते?**

पचनाव्यतिरिक्त तंतुमय पदार्थ अनेक आरोग्य समस्यांच्या प्रतिबंध आणि उपचारांसाठी महत्त्वाचे ठरतात. अन्नामधील तंतुमय पदार्थांच्या कमतरतेमुळे बद्धकोष्ठता, मूळव्याध, अपचन यांसारख्या समस्या उदभवू शकतात. तंतुमयतेचा घटक रक्तातील

### डॉ मनसुख मांडवीया यांनी उन्हाळ्याशी संबंधित

## आजारांच्या व्यवस्थापनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सज्जतेचा घेतला आढावा

**नवी दिल्ली :** 'उष्णतेच्या लाटेच्या सुयोग्य व्यवस्थापनाकरिता लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे कारण प्रभावी उपाययोजनेद्वारे प्रभावी व्यवस्थापन होते'' असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडवीया यांनी केले. उष्णतेशी संबंधित आजाराच्या व्यवस्थापनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सज्जतेचा आढावा घेण्यासाठी आज त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती प्रवीण पवार आणि नीती आयोगाचे सदस्य (आरोग्य) डॉ. व्ही के पॉल, हे देखील उपस्थित होते. क्षेत्रीय स्तरावर अचूक डेटाचा अभाव अधोरेखित करताना, परिस्थितीचे वास्तववादी मूल्यांकन करता येण्यासाठी डॉ. मांडवीय यांनी उष्णतेच्या लाटेबाबतची इत्यंभूत माहिती तसेच उष्माघातामुळे मृत्यूच्या नोंदीसह क्षेत्रीय पातळीवरील डेटा सामायिक करण्यासाठी राज्यांकडून प्राप्त माहितीसह केंद्रीय डेटाबेस तयार करण्याचे महत्त्व नमूद केले. राज्यांना भारतीय हवामान खात्याद्वारे इशारा प्राप्त झाल्यावर वेळेवर कृती करण्याच्या महत्वावरही त्यांनी भर दिला.

उष्णतेच्या विकारांच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी सहयोगी प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित करून केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अधिक चांगला समन्वय साधून परिस्थितीच्या आकलनासाठी राज्यांसोबत बैठक घेण्याची सूचना केली.

लोकांमध्ये माहिती आणि जनजागृती मोहिमेसाठी राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यावर डॉ. भारती प्रवीण पवार यांनी भर दिला. आयुष्मान आरोग्य मंदिरांना वॉटर कुलर, आइस पॅक आणि इतर मूलभूत गरजांनी सुसज्ज करण्याचे महत्त्व त्यांनी नमूद केले. उष्णतेच्या लाटांच्या दुष्परिणामांना तोंड देण्यासाठी राज्यांनी राज्य कृती आराखड्याच्या क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणीला गती देण्याची गरजही त्यांनी विशद केली.

राज्य स्तरावर पालन केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक तत्त्वांच्या तपासणी सूचीची खातरजमा करण्याचे महत्त्व डॉ. व्ही के पॉल यांनी नमूद केले. वेबिनार आणि इतर पद्धतींद्वारे उपचार मानक प्रणालीबाबत जनजागृती करण्यावर त्यांनी भर दिला. उष्णतेशी संबंधित प्रकरणे आणि आजारांबाबत प्रत्येक राज्यातील डेटाचे संकलन करण्यावरही त्यांनी भर दिला.

२३ राज्यांमध्ये उष्मा कृती योजना अद्ययावत करण्यात आल्या आहेत तर सुमारे १०० जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कृती मोहीम सुरू असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. उष्माघाताची प्रकरणे आणि मृत्यूंच्या नोंदीबाबत मानक प्रणाली; आणि उन्हाळी हंगामापूर्वी आणि त्यादरम्यान सज्जतेची योजना, संवेदनशील विभागांमध्ये उष्णता विकारांवर विशेष भर देण्यात आला.

केंद्रीय आरोग्य सचिवांनी २९ फेब्रुवारी २०२४ रोजी सर्व मुख्य सचिवांना एक मार्गदर्शक सूचना जारी केली असून त्यात उष्णतेशी संबंधित आजारांवरील राष्ट्रीय कृती आराखड्याचे राज्यांना पालन करण्याची विनंती करण्यात आली असल्याबाबत अवगत करण्यात आले. राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राद्वारे (एनसीडीसी) सामान्य लोक तसेच वंचित लोकांसाठी उन्हाळ्याच्या महिन्यांत काय करावे आणि करू नये याचीही माहिती देण्यात आली आहे.

# युद्धग्रस्तांना जेवण पुरवणाऱ्या ७ मानवतावादी कार्यकर्त्यांचा इस्रायलच्या हल्ल्यात मृत्यू



**राजदंड न्युज नेटवर्क :** गाझामध्ये इस्रायलच्या हवाई हल्ल्यात ७ परदेशी कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. वर्ल्ड सेंट्रल किचन या स्वयंसेवी (थउघ) संस्थेने माहिती देताना सांगितलं की, या हल्ल्यात युनायटेड किंगडम, पोलंड आणि ऑस्ट्रेलियासह विविध देशांमधील कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला आहे.

वर्ल्ड सेंट्रल किचनचे संस्थापक आणि शेफ होजे आंद्रे यांनी सांगितलं की, हे कर्मचारी इस्रायलच्या हवाई हल्ल्यात मारले गेले. यावर इस्रायल लष्कराने सांगितलं की ते या घटनेची चौकशी करत आहेत.

गाझा येथील हमासच्या माध्यमांनी देखील या हल्ल्यासाठी इस्रायलला दोषी ठरवलं आहे. गाझा येथे बीबीसीसाठी काम करणाऱ्या एका पत्रकाराने माहिती देताना सांगितलं की, मृत कर्मचाऱ्यांपैकी तीन जण परदेशी नागरिक होते. आणि त्यांचा वाहन चालक पॅलेस्टाईनचा होता. या ठिकाणाहून त्यांचे पासपोर्टही जमा करण्यात आलेत.

थउघ ने आपल्या एका निवेदनात म्हटलंय की, त्यांच्या टीममधील सात जण मृत्यूमुखी पडले असून हे सर्व ऑस्ट्रेलियन, पोलिश, ब्रिटिश, पॅलेस्टिनी आणि एक अमेरिकी-कॅनेडियन नागरिक होते.

खऊ‌ऋ च्या हल्ल्यात आमच्या दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची बातमी ऐकून मला धक्का बसला आणि वाईट वाटल्याचं संस्थेच्या सीईओ एरिन गोर यांनी म्हटलंय.

लोकांचं पोट भरण्यासाठी त्यांनी दाखवलेला दृढनिश्चय लोकांच्या मनात सदैव लक्षात राहील. आम्ही त्यांना कधीही विसरू शकणार नाही आणि त्यांची आठवण सदैव आमच्या मनात राहील.

सोबतच या घटनेनंतर थघउ ने या क्षेत्रातील आपले मदत कार्य तात्काळ थांबवत असल्याचं त्यांनी सांगितलं.

त्यांनी पुढे सांगितलं की, मारले गेलेले लोक मध्य गाझा येथील दीर अल-बलाह गोदामातून बाहेर पडत होते. समुद्री मार्गाने गाझा येथे आणलेल्या १०० टनहून अधिक खाद्यपदार्थ उतरवून घेण्यासाठी जी टीम होती, त्यांचा ते भाग होते.

कथित हल्ल्याचे आणखी तपशील अद्याप समोर येत आहेत.

व्हाइट हाऊस राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे प्रवक्ते एड्रिएन वॉटसन यांनी म्हटलंय की, थघउ च्या सहायक कर्मचाऱ्यांच्या मृत्यूने आम्हाला धक्का बसलाय.

मानवतावादी कार्यकर्त्यांची सुरक्षा सुनिश्चित केली पाहिजे कारण ते अत्यंत आवश्यक अशा मदतीचा पुरवठा करतात. या प्रकाराची त्वरित चौकशी करावी असं आवाहन देखील आम्ही इस्रायलला केलं आहे.

इस्रायलच्या हल्ल्यात सात परदेशी मदत कर्मचाऱ्यांचा मृत्यूफोटो स्रोत,ऋएढध खच-ऋएड

गाझा पट्टीतील इस्रायली हवाई हल्ल्यात ऑस्ट्रेलियन नागरिकाचा मृत्यू झाल्याबद्दल ऑस्ट्रेलियाने तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी मृतांमधील लालजावमी फ्रॅंककॉम यांचाही समावेश असल्याची पुष्टी केली असून त्यांनी मृतांच्या कुटुंब आणि मित्रांप्रति आपली संवेदना व्यक्त केली आहे.

पंतप्रधान अँथनी म्हणाले की, हे लोक गाझातील लोकांसाठी मदत पुरवण्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून स्वेच्छेने काम करत होते. त्यामुळे हा हल्ला पूर्णपणे अस्वीकार्य आहे.

या घटनेची संबंधित देशाने जबाबदारी घेतली पाहिजे. शिवाय भविष्यात अशी दुर्घटना घडू नये याविषयी सतर्क राहिलं पाहिजे असंही अँथनी म्हणाले.

इस्रायलच्या हल्ल्यात सात परदेशी मदत कर्मचाऱ्यांचा मृत्यूफोटो स्रोत,ऋएढध खच-ऋएड

पॅलेस्टाईनच्या वैद्यकीय मदत कर्मचाऱ्याने नाव न जाहीर करण्याच्या अटीवर बीबीसीला सांगितलं की, मदत कर्मचाऱ्यांनी वर्ल्ड सेंट्रल किचन (थउघ) लोगो असलेली बुलेटप्रूफ जॅकेटं घातली होती.

सेलिब्रिटी शेफ असलेल्या आंद्रेस आपल्या ट्विटर पोस्ट मध्ये इस्रायली सरकारने ही अंधाधुंद हत्या थांबवावी असं आवाहन केलंय.

या संस्थेने अलीकडेच गाझावासियांसाठी शेकडो टन अन्न पुरविण्याच्या बातम्या छापून आल्या होत्या.

या बातम्यांवर टिप्पणी करताना, खऊ‌ऋ ने म्हटलंय की ते या दुःखद घटनेची परिस्थिती समजून घेण्यासाठी सखोल पुनरावलोकन करतील.

सोबतच मानवतावादी मदतीचे सुरक्षित वितरण करता यावं आणि गाझामधील लोकांना अन्न आणि औषधी पुरविण्यासाठी थउघ सोबत जवळून काम करता यावं यासाठी खऊ‌ऋ व्यापक प्रयत्न करेल.

यावर यूके परराष्ट्र मंत्रालय आणि पोलिश परराष्ट्र मंत्रालयाचं मत जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क करण्यात आला आहे.

# तैवान भूकंप, २ भारतीय बेपत्ता, शोध मोहीम सुरू

### २४ तासांत ५ पेक्षा जास्त तीव्रतेचे २०० आफ्टरशॉक; आतापर्यंत ९ मृत, १००० जखमी





**राजदंड न्युज नेटवर्क :** तैवानमध्ये ३ एप्रिल रोजी ७.५ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. यामध्ये १०० हून अधिक इमारती, अनेक रस्ते, पूल आणि बोगद्यांचे नुकसान झाले. ५० हून अधिक लोक बेपत्ता असल्याची माहिती आहे. त्यापैकी दोन भारतीय आहेत. ते शेवटचे तारोको नॅशनल पार्कमध्ये दिसले होते. हे उद्यान भूकंपाच्या केंद्राच्या अगदी जवळ आहे.

पूर्व तैवानमधील हुआलियन शहरात बुधवारी भारतीय वेळेनुसार पहाटे साडेपाच वाजता भूकंप झाला. बेपत्ता लोकांचा शोध सुरू आहे. बचाव मोहिमेशी संबंधित अधिकाऱ्यांनी वृत्तसंस्था एपीला सांगितले की, बेपत्ता भारतीयांचा शोध सुरू आहे. आतापर्यंत हजाराहून अधिक लोक जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर ९ जणांचा मृत्यू झाला आहे.

अमेरिकन मीडिया, गेल्या २४ तासांत २०१ आफ्टरशॉक आले. सर्वांची तीव्रता ५ पेक्षा जास्त होती. त्याच वेळी, सर्वात जोरदार भूकंपाची तीव्रता ६.५ होती. बाहेरील भागात भूस्खलनही झाले.

**पीएम मोदी म्हणाले- आम्ही पीडितांच्या पाठीशी आहोत**

तैवानमध्ये झालेल्या भूकंपामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शोक व्यक्त केला आहे. सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये पंतप्रधानांनी लिहिले की, भूकंपात जखमी झालेल्यांना लवकरात लवकर बरे होण्यासाठी मी शुभेच्छा देतो. या कठीण काळात आम्ही तैवानच्या लोकांसोबत आहोत.

त्याचबरोबर भारताने तैवानमध्ये राहणाऱ्या भारतीयांसाठी एक डव्हायजरी जारी केली आहे. इंडिया तैपेई असोसिएशनने आपत्कालीन क्रमांक आणि ई-मेल आयडी जारी केला आहे.

तैवानमध्ये झालेल्या भूकंपाचे धक्के जपान आणि फिलिपाइन्समध्येही जाणवले. तिन्ही देशांमध्ये सुनामीचा इशारा देण्यात आला होता. जपानच्या हवामान खात्याने समुद्रात ३ मीटर किंवा सुमारे १० फुटांपर्यंत लाटा उसळण्याची शक्यता वर्तवली होती. मात्र, तब्बल ६ तासांनंतर हा इशारा मागे घेण्यात आला.

आलियन शहरातील १४ हजार घरांमध्ये पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. येथील लोकांना पिण्याचे पाणी नाही. सुमारे एक हजार घरे अशी आहेत जिथे वीज नाही. भूकंपामुळे वीज प्रकल्पाचे नुकसान झाले. ४० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली. काही फ्लाइट्सच्या वेळा बदलण्यात आल्या.

तैवानच्या नॅशनल फायर एजन्सीनुसार, भूकंपानंतर १२० लोक अडकल्याची माहिती आहे. त्यापैकी ७७ लोक बोगद्यात अडकले आहेत. बोगद्याचे काही भाग तुटल्याने अनेक ठिकाणी रस्ते बंद झाले आहेत. याशिवाय ४ मिनी बसमध्ये सुमारे ५० लोक अडकून पडले आहेत. या बसेस हुआलियन शहरातून तारोको नॅशनल पार्ककडे प्रवाशांना घेऊन जात होत्या.

ठार झालेल्यांमध्ये तीन गिर्यारोहकांचा समावेश आहे.भूकंपामुळे आतापर्यंत ९ जणांचा मृत्यू झाला आहे. यापैकी ३ गिर्यारोहक होते. तारोको नॅशनल पार्कमधील प्रसिद्ध पर्यटन स्थळ तारोको गॉर्ज पाहण्यासाठी ते पायी निघाले होते. त्यांच्यावर एक दगड पडला. त्याचवेळी इमारतीची भिंत कोसळल्याने एका महिलेचा मृत्यू झाला. भूकंपानंतर ती इमारतीतून बाहेर आली होती, पण तिची मांजर घेण्यासाठी परत आत गेली होती.

सुहुआ हायवेवरून जाणाऱ्या ट्रकवर दगडाचे तुकडे पडले. यादरम्यान दोन ट्रक चालकांचा मृत्यू झाला. या भागातील किंगशुई क्लिफ या पर्यटनस्थळावर दगड कोसळल्याने एकाचा मृत्यू झाला. रस्ता खचल्याने आणखी दोन जणांचा मृत्यू झाला.अनेक भागात आणि रस्त्यांवर दरड कोसळल्या. येथून जाणाऱ्या लोकांवर दगड कोसळले. अनेक भागात आणि रस्त्यांवर दरड कोसळल्या. येथून जाणाऱ्या लोकांवर दगड कोसळले. तैवानच्या सेंट्रल वेदर ब्युरोच्या म्हणण्यानुसार, ३ एप्रिलला आलेला भूकंप हा तैवानला २५ वर्षांतील सर्वात शक्तिशाली भूकंप होता. याआधी १९९९ मध्ये ७.६ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. तेव्हा २ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. दरवर्षी जगात अनेक भूकंप होतात, पण त्यांची तीव्रता कमी असते. राष्ट्रीय भूकंप माहिती केंद्र दरवर्षी सुमारे २०,००० भूकंपांची नोंद करते. यापैकी १०० भूकंप असे आहेत की ज्यामुळे जास्त नुकसान होते. भूकंप काही सेकंद किंवा काही मिनिटे टिकतो. इतिहासातील सर्वात जास्त काळ टिकणारा भूकंप २००४ मध्ये हिंदी महासागरात झाला होता. हा भूकंप १० मिनिटे चालला.

## अरविंद केजरीवाल तुरुंगात असूनही मुख्यमंत्रीपदी कायम राहू शकतात? उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निकाल

**दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्ली सरकारच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अरविंद केजरीवाल यांना अटक केली असून ते सध्या तिहार तुरुंगात आहेत. न्यायालयाने त्यांना १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे. अशातच दिल्ली उच्च न्यायालयात केजरीवाल यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवण्याची मागणी करणारी याचिका दाखल करण्यात आली होती. ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. एएनआय या वृत्तसंस्थेने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे.


उच्च न्यायालयाने कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ईडीच्या अटकेत असलेल्या केजरीवाल यांची मुख्यमंत्रीपदावरून उचलबांगडी करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी करणारी याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. न्यायालयाने या याचिकेवर विचार करण्यासही नकार दिला. या याचिकेवर न्यायालयात युक्तिवाद चालू असताना न्यायमूर्ती म्हणाले, कधीकधी वैयक्तिक हित राष्ट्रीय हिताच्या आधीन असायला हवं.

हिंदू सेना नावाच्या संघटनेचे अध्यक्ष विष्णू गुप्ता यांनी केजरीवाल यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली होती. गुप्ता म्हणाले, केजरीवाल यांनी दिल्लीच्या मद्य धोरणात घोटाळा केला आहे, त्यांनी पैशांची अफरातफर केली असून ते सध्या तुरुंगात आहेत, त्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपदावर राहण्याचा अधिकार नाही. न्यायालयाने त्यांना या पदावरून हटवण्याचे निर्देश द्यायला हवेत.

कार्यवाहक न्यायमूर्ती मनमोहन आणि न्यायमूर्ती मनमीत प्रीतम सिंह अरोरा यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे की, मुख्यमंत्रीपदावर राहायचं आहे किंवा नाही याबाबतचा निर्णय केजरीवाल यांचा असेल.

# अमेठी लोकसभेसाठी गांधी कुटुंबाचे जावई रॉबर्ट वाड्रा इच्छूक, म्हणाले, 'स्मृती इराणींना लोक कंटाळले'

**अमेठी :** काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीस प्रियांका गांधी यांच्या पती रॉबर्ट वाड्रा हे अमेठीमधून निवडणूक लढण्यास इच्छूक असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत अमेठीमधील लोक माझी नेहमी भेट घेत असतात. ते विद्यमान खासदार स्मृती इराणी यांना कंटाळले असून मी त्यांचे प्रतिनिधित्व करावे, अशी त्यांची इच्छा असल्याचे रॉबर्ट वाड्रा एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले आहेत. उत्तर प्रदेशमधील अमेठी आणि रायबरेली या दोन मतदारसंघांवर काँग्रेसचे पारंपरिक वर्चस्व राहिलेले आहे. मात्र २०१९ साली भाजपाच्या स्मृती इराणींनी राहुल गांधींचा येथून पराभव केला. तर रायबरेली येथून सोनिया गांधींचा विजय झाला. यावेळी रायबरेलीमधून प्रियांका गांधी वाड्रा निवडणूक लढवित आहेत.



एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना रॉबर्ट वाड्रा म्हणाले, उत्तर प्रदेशमधील अमेठी, रायबरेली आणि सुलतानपूर या मतदारसंघाने अनेक वर्ष गांधी कुटुंबावर प्रेम केले. आता अमेठीची जनता गांधी कुटुंबातील सदस्य आमचा प्रतिनिधी असावा, अशी मागणी करत आहे. जर मला निवडणूक लढवायची असेल तर ती अमेठीतूनच लढवावी, अशी मागणी अमेठीमधील कार्यकर्त्यांनी माझ्याकडे केली आहे.

अमेठीची जनता विद्यमान खासदार स्मृती इराणी यांच्या नेतृत्वावर नाराज आहे, असेही रॉबर्ट वाड्रा म्हणाले. २०१९ साली त्यांना निवडून देऊन आम्ही चूक केली, अशी कबुली अमेठीवासी देत असल्याचेही ते म्हणाले. उत्तर प्रदेशमधील ८० पैकी १७ जागा काँग्रेस पक्ष लढविणार आहे. त्यापैकी अमेठी आणि रायबरेली मतदारसंघाचे उमेदवार काँग्रेसने जाहीर केलेले नाहीत. अमेठीमधून राहुल गांधींनी यावेळी पुन्हा एकदा निवडणूक लढवावी, अशी मागणी उत्तर प्रदेशमधील काँग्रेसच्या नेत्यांनी केली आहे. २०१९ साली राहुल गांधी यांनी अमेठी आणि केरळमधील वायनाड या दोन लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. त्यापैकी वायनाडमधून ते विजयी झाले. यावेळीही त्यांनी वायनाड मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. रायबरेलीमधून सोनिया गांधी यंदा निवडणूक लढविणार नाहीत, हे त्यांनी आधीच जाहीर केले आहे.

त्यांच्याऐवजी प्रियांका गांधी यांना रायबरेलीतून उमेदवारी दिली जाईल, अशी चर्चा आहे. अमेठीबाबत बोलताना रॉबर्ट वाड्रा म्हणाले, मी माझ्या राजकीय जीवनाच्या कामाची सुरुवात अमेठीमधून केली होती. १९९९ साली प्रियांका गांधी यांच्यासह अमेठीमधेच मी काँग्रेसचा प्रचार केला होता. तेव्हापासून माझा अमेठीच्या जनतेशी संपर्क राहिलेला आहे.